दैनिक
# समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG

https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com

वैभव विवेक स्वामी
संपादक

राजमान्य, राजशक्ती
No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | वर्ष - ५ वे | अंक -२२९ मंगळवार,दि.२२ एप्रिल २०२५ | 98 22 62 85 21 | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ | किंमत ३ रु | पाने ४

Beed | Daily Marathi | Year-5th | Issue-229 | Tuesday, Dt.22 April 2025 | 98 22 62 85 21 | RNI - MAHMAR/2020/79801 | Price 3 Rs. | Pages 4




बीड - करोडो रुपये खर्च करून उभारण्यात येणारे बीडचे मध्यवर्ती बस स्थानक अर्थमंत्री तथा पालकमंत्री अजित पवार साहेब निधीमुळे ठप्प आहे. प्रवाशांचे बेहाल होत आहेत..

# पालकमंत्री अजितदादा, बीडच्या नवीन बस स्थानकाचे काम निधी अभावी रखडले !

## महिलांना शौचास उघड्यावर जावे लागते, चोरट्यांचा धुमाकूळ, कॅन्टीनचे गेट बंद केल्याने प्रवाशांचे हाल, पिण्याचे पाणी आणि आडोसा ही नाही, धुळीमुळे प्रवासी होतायेत बेजार !!

## भर दुपारी महिलांच्या घोळक्यात जावून हस्तमैथुन करणाऱ्या रंगेल मस्तवालला प्रवाशांनीच ठोकले, बीडचे आगार व्यवस्थापन आणि पोलीस प्रशासन झोपले का ?

बीड / वैभव स्वामी

बीडच्या बस स्थानकावर असुविधांचा कहर झाला आहे. रखरखत्या उन्हात प्रवाशांना बीड आगार प्रमुखांच्या वतीने कुठेही आडोसा निर्माण केला गेला नाही. भर उन्हात प्रवाशांना तासनतास उभा राहावे लागते. बस कुठे येते ? कुठून निघून जाते ?प्रवाशांना थांग पत्ता लागत नाही. बस स्थानकात उभे राहून सुद्धा बस निघून जाते आणि प्रवासी तिथेच उभे राहतात. हे केवळ नियोजनाच्या अभावामुळे होत आहे. बीड आगाराच्या वतीने येणाऱ्या प्रवाशांसाठी पिण्याच्या पाण्याची कसलीही व्यवस्था नाही. सामाजिक संस्था आणि कार्यकर्त्यांनीच पाण्याच्या जारची व्यवस्था केलेली आहे. नवीन बस स्थानकाच्या इमारतीमुळे सर्वत्र पाडापाडी झाल्याने मोठ्या प्रमाणात धूळ निर्माण होते. त्याचबरोबर शौचालयाची व्यवस्था नसल्याने महिलांना कुठलातरी कोपरा अथवा अडोसा गाठून जावे लागते. त्या ठिकाणी काही अंबट शौकीन उभे राहून नको ते दृश्य पहात राहतात. काही महाभाग तर त्याचे व्हिडिओ शूटिंग करून कहर करत आहेत. २१ एप्रिल रोजी तर बीड बस स्थानकावर मर्यादेचा कडेलोट झाला. एका महाभागाने ज्या ठिकाणी प्रवासी महिला सर्वाधिक थांबलेल्या आहेत अशा महिलांच्या घोळक्याजवळ जाऊन थेट आपल्या पॅन्ट मधून आपले नको ते सामान बाहेर काढत हस्तमैथुन करण्यास सुरुवात केली. ही बाब ज्या महिलांच्या लक्षात आली त्यांनी लाजेने त्या ठिकाणाहून दुसरीकडे जाणे पसंत केले. तर काही संतप्त झालेल्या महिलांनी त्या महाभागाला चांगलाच दणका दिला. जेंव्हा ही बाब त्या ठिकाणी उपस्थित असलेल्या पुरुष प्रवाशांना लक्षात आली तेंव्हा सर्वच प्रवाशांनी मिळून या रंगेल महाठकाला चांगलेच ठोकून काढले. त्यानंतर पोलिसांना बोलावून त्यांच्या स्वाधीन केले. मात्र दुर्दैवाने ही घटना सुरू झाल्यापासून संपेपर्यंत बीड बस स्थानकातील पोलीस कुठे गायब होते ? बीड बस स्थानकात पोलीस कधीच हजर राहत नाहीत ?त्यामुळे चोऱ्यांचे प्रमाण देखील वाढले आहे ? या सर्व सुविधांकडे बीड जिल्हा आगार व्यवस्थापन लक्ष देणार आहे का ? मोठ्या विश्वासाने बीडच्या बस स्थानकात येणाऱ्या प्रवाशांना विश्वास आणि दिलासा बीड आगार व्यवस्थापन देणार आहेत का ? पोलीस प्रशासन आता तरी बीड बस स्थानकामध्ये कर्तव्यदक्ष पोलीस कर्मचारी आणि अधिकारी नियुक्त करणार आहेत का ? का एखादी मोठी घटना घडल्यानंतरच किंवा पुन्हा एकदा बीड बदनाम झाल्यानंतर पोलिसांना जाग येणार आहे का ? या गंभीर प्रश्नांसह प्रामुख्याने बीडचे नवीन अद्यावत बस स्थानकाचे पुढील काम निधी अभावी मागील काही दिवसांपासून ठप्प झाले आहे. पालकमंत्री तथा महाराष्ट्राचे अर्थमंत्री अजितदादा पवार साहेब याकडे लक्ष देणार आहेत का ? त्याचबरोबर बीड बस

(उर्वरीत पान २ वर)

### महिलांच्या घोळक्यात उभे राहून भर दुपारी हस्तमैथुन करणाऱ्या महाभागाला झोडपले !

सोमवार दिनांक २१ फेब्रुवारी रोजी भर दुपारी दीड वाजण्याच्या सुमारास बीड बस स्थानकाच्या आगारात एक माथेफेरू तरुण आला. काही कळायच्या आत त्याने आपल्या पॅन्ट मधून चक्क .... बाहेर काढून स्वतःच्या हाताने हस्तमैथुन करण्यास सुरुवात केली. काही वेळाने ही बाब काही महिलांच्या लक्षात आली. त्यांनी शरमेने मान खाली घालून त्या ठिकाणाहून लांब जाणे पसंत केले. तर काही महिला संतप्त झाल्या त्यांनी त्याच्या दोन कानाखाली लगावल्या. त्यानंतर ही बाब उपस्थित असलेल्या इतर प्रवाशांच्या लक्षात आल्यानंतर त्याला सर्वांनीच मिळून चांगला झोडपला. बीड बस स्थानकावर कायम प्रवाशांच्या मदतीसाठी तैनात असलेल्या मोटरसायकल पार्किंगचे चालक मालक अख्तर खान यांनी त्याला दणके देत पोलिसांना फोन करून बोलावून घेत पोलिसांच्या स्वाधीन केले. मात्र दुर्दैवाने बीड बस स्थानकावर तैनात असणारी पोलीस यंत्रणा कुठे गायब होती. हा प्रश्न या निमित्ताने पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

### बीडच्या कॅन्टीनचा दरवाजा केला नाही बंद ?

बीड बस स्थानकामध्ये कॅन्टीनची सुविधा केलेली आहे. या कॅन्टीनला पाठीमागील बाजूला एक दरवाजा आहे तो दरवाजा बीड आगार व्यवस्थापनाने बंद करण्यास सांगितला आहे. तो दरवाजा बंद केल्यामुळे अनेक प्रवाशांना उलटा फेरा मारून बीडच्या बस स्थानकात यावे लागत आहे. प्रवाशांच्या सुख सोयी पाहण्यापेक्षा त्यांची गैरसोय जास्त कशी होईल याकडेच बीडचे आगार व्यवस्थापन लक्ष देणार आहे का ? बीड मधील प्रवाशांची गैरसोय होईल याकडे लक्ष देणार नाही का ?

### 1 बस स्थानकावरील पोलीस चौकी केवळ शोभेला

बीड बस स्थानकामध्ये पोलीस चौकी उभारण्यात आलेली आहे. मात्र या पोलीस चौकीत कधीच कर्तव्यात असलेला पोलीस अधिकारी कर्मचारी उपस्थित नसतो. तो बीड बस स्थानकाकडे फिरकत सुद्धा नाही. मग याचे आणि अवैध व्यावसायिक धारकांचे अथवा चोरट्यांचे काही लागेबांधे आहेत का ? पोलीस नसल्यामुळे मागील काही दिवसापासून बीड बस स्थानकावर मोबाईल चोरीचे आणि पाकीट दागिने पर्स अमूल्य वस्तू बॅग चोरीला जाण्याचे प्रमाण वाढले आहे. याला जबाबदार कोण यावर आळा कोण घालणार ?

### 2 मागील काही दिवसात चोरट्यांचे प्रमाण वाढले...

बीड बस स्थानकाच्या आगारातून मद्यधुंद अवस्थेत असलेल्या आणि झोपलेल्या प्रवाशांच्या खिशातून मोबाईल चोरी करणाऱ्यांची संख्या वाढली आहे. एवढेच नव्हे तर मोठ्या प्रमाणात महिला, लहान मुली, मुले आणि सराईत चोरटे बस स्थानकात येऊन प्रवाशांचे पाकीट, मौल्यवान दागिने, बॅग, पर्स चोरून नेत आहेत. पोलीस प्रशासन याकडे लक्ष देणार नाही का ?

### 3 नवीन अद्यावत बस स्थानकाचे काम निकृष्ट...

करोडो रुपये खर्च करून बीड बस स्थानकाचे काम उभारले जात आहे. मात्र दुर्दैवाने या कामांमध्ये मोठ्या प्रमाणात निष्काळजीपणा आणि निकृष्ट दर्जाचे काम गुत्तेदार आपल्या स्वार्थासाठी करत आहे अशी तक्रार जाणकार करत आहेत.याकडे कर्तव्यदक्ष असलेले बीडचे पालकमंत्री तथा राज्याचे अर्थमंत्री लक्ष देणार नाहीत का ? सदरील गुत्तेदार सत्ताधारी पक्षाचा असल्याने त्याच्या बोगसगिरीवर पांघरून घालणार आहे का ? सदरील कामाच्या दर्जेबाबत योग्य त्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून योग्य वेळी चौकशी होणे देखील गरजेचे आहे. एकदा जर हे काम निकृष्ट दर्जाचे झाले तर पुन्हा बीड बस स्थानकाचे काम नव्याने होणार नाही. याकडे शासन आणि प्रशासनाने लक्ष वेधणे गरजेचे आहे. कारण बीडचे मध्यवर्ती बस स्थानक शेकडो नव्हे हजारो लाखो प्रवाशांचे प्रमुख आगार आहे.




बीड - मध्यवर्ती बस स्थानकामध्ये असलेल्या या कॅन्टीनच्या दरवाजा मधून रस्त्याच्या पाठीमागून येणाऱ्या प्रवाशांना बस स्थानकात येणे सोयीचे जाते. बस स्थानकामधील प्रवाशांना बाहेर पडणे सोपे होते. याबाबत कॅन्टीन चालकांना कसलाही त्रास नाही. मग बीडच्या आगारप्रमुखांनाच कसली ऍलर्जी झाली आहे ? ज्यामुळे त्यांनी हा दरवाजा बंद करून प्रवाशांची गैरसोय वाढवली आहे.




बीड - बीड जिल्हा मध्यवर्ती बस स्थानकामध्ये पोलीस ठाणे उभारण्यात आलेले आहे. मात्र या पोलीस चौकीमध्ये नियुक्त असलेला कोणताही पोलीस अधिकारी कर्मचारी कधीही उपस्थित नसतो. याकडे शिवाजीनगर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक जाणीवपूर्वक अक्षम्य दुर्लक्ष करतात ते का ?



बीड - बीडच्या बस स्थानकावर पोलिसांचा धाक राहिला नाही. हा माथेफिरू २१ एप्रिल रोजी भर दुपारी महिलांच्या पाठीमागे उभे राहून सर्वांच्या देखत महिलांकडे पाहून हस्तमैथुन करत होता. अखेर संतप्त झालेल्या काही महिलांनी पुढे येत या माथेफिरूला चांगलाच दणका दिला. त्यानंतर बस स्थानकावरील प्रवाशांनी त्याला चांगला चोप देऊन पोलिसांच्या हवाली केला.



बीड - उभ्या असलेल्या बसच्या आडोशाला जाऊन किंवा कुठलातरी कोपरा पाहून महिलांना लघु शंकेला बसावे लागते. या ठिकाणी आजूबाजूला काही आंबट शौकीन उभे राहून नको ते पाहत मोबाईल मध्ये देखील शूटिंग करत आहेत. यामुळे महिलांनी शौचालयाला कुठे जावे आणि त्यांच्या ईभ्रतीचा प्रश्न निर्माण झाला आहे. याला जबाबदार कोण ?

## कर्करोग मोबाईल व्हॅन द्वारे रुग्ण तपासणीचा शुभारंभ

# जिल्हा रुग्णालयात सोमवारी २५० रुग्णाची तपासणी

बीड (प्रतिनिधी):

महाराष्ट्र शासनाच्या आरोग्य विभागाच्या वतीने बीड जिल्ह्यात फिरती मोबाईल व्हॅन द्वारे कॅन्सरग्रस्त महिलाची तपासणी सोमवार दिनांक २१ एप्रिल २०२५ रोजी बीड जिल्हा रुग्णालयात सुरू करण्यात आली आहे. प्रभारी जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.संजय राऊत, अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक शहाणे, समन्वयक डॉक्टर हनुमंत पारखे, निवासी वैद्यकीय अधिकारी (बाह्य विभाग) लक्ष्मीकांत तांदळे यांच्या उपस्थितीत महिला रुग्ण तपासणीचा शुभारंभ सोमवारी करण्यात आला. सोमवारी बीड जिल्हा रुग्णालयात झालेल्या तपासण्यात मुख कॅन्सर १४२, पिशवीचे कॅन्सरग्रस्त ४५, आणि स्तन कॅन्सरग्रस्त ७५ अशा एकूण सुमारे २५० रुग्णांची तपासणी करण्यात आली आहे.

दिनांक २२ एप्रिल रोजी चौसाळा २३ एप्रिल रोजी रायमोहा या ठिकाणी करण्यात येणार आहे. सुमारे एक महिनाभर बीड जिल्ह्यात तालुका निहाय ठरवून दिलेल्या गावात रुग्ण तपासणी करण्यात येणार आहे.

सोमवारी कॅन्सर मोबाईल आणि रुग्ण तपासणीचा शुभारंभ प्रसंगी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.संजय राऊत, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. उल्हास गंडाळ, अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक शहाणे, निवासी वैद्यकीय अधिकारी तांदळे, समन्वयक डॉ.हनुमंत पारखे आदींसह वैद्यकीय अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.




शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
Bureau of Indian Standards
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ
सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777

## संपादकीय

# तृष्णेचे मोल

गारगाई प्रकल्प हा पालघर जिल्ह्यात होणार असून त्यासाठी आवश्यक असलेल्या वन व पर्यावरणाच्या प्रस्तावांवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुरुवारी मंजुरीची मोहोर उमटविली.

टँकरचा संप झाला असता, गगनचुंबी टॉवरनी वेढलेल्या शहराच्याही तोंडचे पाणी कसे पळते, याचा दाहक अनुभव मुंबईने अलीकडेच घेतला. उन्हाचा तलखी वाढू लागली आणि पावसाचे आगमन लांबले, की मुंबईत पाणीकपातीचे संकट घोंघावू लागते. या अशा काळातच गारगाई प्रकल्पाला गती मिळाल्याचे दिलासा देणारे वृत्त मुंबईकरांसाठी आले आहे.

गारगाई प्रकल्प हा पालघर जिल्ह्यात होणार असून त्यासाठी आवश्यक असलेल्या वन व पर्यावरणाच्या प्रस्तावांवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुरुवारी मंजुरीची मोहोर उमटविली. गेल्या दीडशे वर्षांत मुंबईला पाणीपुरवठा करण्यासाठी सात जलाशय तयार झाले. ब्रिटिश काळात विहार-तुळशी प्रकल्पांपासून सुरुवात होऊन अगदी अलीकडे २०१२मध्ये मध्य वैतरणा येथे शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे धरण बांधण्यात आले. मुंबईत दिवसाला सुमारे ३९०० दशलक्ष लिटर इतका पाणीपुरवठा जलवाहिन्यांद्वारे होतो. तरीही मुंबईची पाण्याची गरज भागत नाही व दिवसाला सुमारे ६०० दशलक्ष लिटर इतकी पाण्याची तूट सध्या मुंबई अनुभवते. ती भरून काढण्याच्या दृष्टीने गारगाई येथील प्रकल्प उपयुक्त ठरेल. मुंबईत पाणीपुरवठा योजनेची घडी अत्यंत शिस्तबद्ध रीतीने बसविण्यात आली आहे. पाणी प्रकल्पांसाठी मुंबई महापालिकेच्या अर्थसंकल्पात एक स्वतंत्र विभागही आहे. इतके असूनही काही परिसर वर्षानुवर्षे तहानलेले असतात. गिरगाव, गिरणगावांत वरच्या मजल्यांवर पाणी चढत नाही.गेल्या दशकभरात मुंबईतील टॉवरची संख्या वाढत चालली आहे आणि यापुढे धारावीसारखे मोठे प्रकल्प येऊ घातले आहेत. लोकांचे राहणीमान सुधारायचे, झोपडीतून सदनिकेत स्थलांतर करायचे, तर पाण्याची गरजही वाढते. तेव्हा एकीकडे मुंबईत मोठमोठे प्रकल्प आणायचा हट्ट धरायचा आणि दुसरीकडे त्यांना रस्ते, पाणी, वीज, गटार या मूलभूत सोयीसुविधांच्या बाबतीत हात आखडता घ्यायचा, असा असमतोल उपयोगाचा नाही. काही वर्षांपूर्वी ४५५ दशलक्ष लिटरचा मध्य वैतरणा प्रकल्प केंद्राच्या परवानग्या न मिळाल्यामुळे ११ वर्षे रखडला होता. त्या काळात आता पाण्याची वेगळी सोय झाली नाही, तर कोणत्याही नव्या बांधकामांना परवानगी देता येणार नाही, असा इशारा तत्कालीन महापालिका आयुक्तांना द्यावा लागला होता.तृष्णेचे मोलमंत्रालयात किंवा महापालिकेत सत्तेवर कोणताही पक्ष असो; बांधकामांना आवर घालण्याची भूमिका कुणालाच परवडणारी नसते. प्रत्येकाला घर द्यायचे, ही कळकळ असेल, तर पाणी आणि मूलभूत सुविधाही द्याव्याच लागणार. त्यामुळेच सभोवतीच्या पर्यावरणाचा ऱ्हास करून प्रकल्प उभारणे, ही अपरिहार्यता ठरते. मात्र त्याविषयीचे भान सर्वांनी बाळगायला हवे. बृहन्मुंबईतील पाणीपुरवठ्यात सुधारणा करण्यासाठी राज्य सरकारने नेमलेल्या जल नियोजन तज्ज्ञ समितीच्या डिसेंबर १९९४च्या अहवालात मध्य वैतरणा, काळू, गारगाई, शाई, पिंजाळ या प्रकल्पांचा उल्लेख आहे. राज्यात काँग्रेस-राष्ट्रवादी व मुंबई महापालिकेत याआधीची शिवसेना-भाजप यांची सत्ता असतानाही वृक्षतोड करूनच मध्य वैतरणा प्रकल्प राबविणे क्रमप्राप्त ठरले होते. आताही पायाभूत सुविधा व विकास यातील दरी सांधण्यासाठी गारगाईचा प्रकल्प हाती घेणे अपरिहार्य आहे. विकास आणि निसर्गाच्या मर्यादा यांचीही सांगड यापुढे घालावी लागेल.केवळ धरण बांधल्यामुळे आपली जबाबदारी संपली, असे म्हणून चालणार नाही. पर्यावरण व लोकांच्या जगण्याशी निगडित काही प्रश्न अत्यंत कळीचे आहेत. वाडा, जव्हार, शहापूर या सर्व भागांच्या ओंजळीतून महामुंबई पाणी पिते, परंतु या परिसरातील आदिवासी जनता मात्र मैलोन् मैल रान तुडवत जाऊन कोरड्या ठाक विहिरीतून थेंब थेंब पाणी शोधते, हे चित्र बदलायला हवे. मुंबईत तीन-चार रुपयांत हजार लिटर या दराने घरोघरी पाणी मिळते. समुद्राचे पाणी गोडे करायचे ठरविल्यास हा खर्च ६०-७० रुपयांच्या पलीकडे जाईल. गारगाई धरणाचा खर्च ३१०० कोटी रुपये आहे, तर तितक्याच क्षमतेच्या मनोरीतील नि:क्षारीकरण प्रकल्पाचा खर्च आठ हजार कोटी रुपयांच्या घरांत आहे. त्यामुळे आज तरी पर्यायी उपाय व्यवहार्य नाहीत. परंतु याचा अर्थ पाण्याची उधळपट्टीही करून चालणार नाही.

# स्व.विश्वंभर कोकिळ जीवन विकास व्याख्यानमाला: पुष्प- १ ले

## यावर्षी व्याख्यानमालेचे २५ व्या वर्षात पदार्पण
## प्रत्येक व्यक्तीने आपले ध्येय निश्चित केले पाहिजे - पद्मश्री डॉ. तात्याराव लहाने

केज/प्रतिनिधी

या स्पर्धेच्या युगामध्ये जीवन जगत असताना प्रत्येक व्यक्तीने ध्येय वादी बनले पाहिजे, तरच आपल्या संकल्पां ची सहज प्राप्ती होईल. ज्यांनी आपल्या मनात आशा,विश्वास,प्रयत्न आणि डोळस श्रद्धा बाळगली असेल,अशी माणसेच आपल्या जीवन ध्येयाची उंच शिखरे सहज गाठू शकतात.जीवनामध्ये अनेक स्वप्न बघा पण वाटचाल करतअसताना टप्प्याटप्प्याने त्याची पूर्तता करा.यासाठी आपण कठोर परिश्रम, दृढ विश्वास आणि प्रबळ इच्छाशक्ती मनात बाळगली पाहिजे संकल्पाला आत्म विश्वासाचा आणि समर्पण वृत्तीचासहवास लाभला तर तो सिद्धीस जातो.आपल्या जीवनाची खरी सार्थकता आशावादी दृष्टिकोन बाळगून जगण्यात आहे.खरं तर आशावादी माणसं प्रयत्नवादी असतात. प्रत्येकाची इच्छाशक्ती ही प्रबळ असली पाहिजे,इच्छाशक्ती कमी असणे हे अपयशाचे लक्षण आहे, यासाठी सर्वंकष ज्ञान आत्मसात करणेगरजेचे आहे.कारण मेरीट चांगली असेल तर सन्मानही योग्यमिळतो. सध्या या तंत्रज्ञानाच्या युगामध्ये व्हाट्सअप, फेसबुक यांच्या वापर मर्यादित केला पाहिजे. अशी साधने आपल्या आरोग्यासाठी अत्यंत घातक ठरत आहेत. त्यामुळे केवळ डोळ्यांचे च नव्हे,तर इतरही आजार उद्भवत आहेत असे प्रतिपादन पद्मश्री डॉ.तात्याराव लहाने यांनी केले.

केज येथील स्वामी विवेकानंद विद्या मंदिर या शाळेमध्ये दि.२० एप्रिल वार रविवार पासून स्व.विश्वंभर कोकिळ जीवन विकास व्याख्यान मालेला नुकतीच सुरुवात झाली.यावर्षी या व्याख्यानमालेने २५ व्या वर्षात पदार्पण केले आहे.तेंव्हा या व्याख्यान मालेचा शुभारंभ प्रमुख वक्ते पद्मश्री डॉ. तात्याराव लहाने, सेवानिवृत्त



वरिष्ठ अधिष्ठाता जे.जे. रुग्णालय,मुंबई यांच्या शुभहस्तेदिपप्रज्वलनाने झाला.याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून मा.लहू गळगुंडे, जिल्हा कोषागार अधिकारी बीड हे उपस्थित होते.इतर मान्यवर उपस्थितमध्ये सचिन देशपांडे,नायब तहसीलदार अंबेजोगाई, गोविंद अण्णा केंद्रे, सामाजिक कार्यकर्ते बीड,नईमोद्दीनइनामदार,संस्थेचे माजी उपाध्यक्ष तसेच जीवन विकास शिक्षण मंडळ संस्थेचे अध्यक्ष अंकुशरावजी इंगळे,संस्थेचे सचिव जी.बी.गदळे,संस्थेचे संचालक नारायण अण्णा अंधारे,शाळेच्या माध्यमिक विद्यालया च्या मुख्याध्यापिका शिवनंदा मुळे,प्राथमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक वसंतराव शितोळे,प्राचार्य शंकर भैरट तसेच संस्थेचे सह सचिव तथा स्वामी विवेकानंद इंग्लिश स्कूलचे मुख्याध्यापक गणेश कोकिळ आदींची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे प्रस्ताविक व पाहुण्यांचा परिचय संस्थेचे सचिव जी.बी. गदळे यांनी दिला. याप्रसंगी ते म्हणाले की, ही संस्था दरवर्षी विविध उपक्रम राबवते तसेच शिक्षकवृंद ही शाळेचा गुणात्मक आलेख टिकवून ठेवण्यासाठी प्रयत्नशील असतात. पहिले पुष्प गुंफताना स्वप्न बघा स्वप्न जगा या विषयावर बोलताना डॉ.तात्याराव लहाने पुढे म्हणाले की,जीवनामध्ये परिपक्व होण्यासाठी संस्कारक्षम शिक्षण घेतले पाहिजे.याप्रसंगी त्यांनी आपल्या जीवना तील काही आठवणींना उजाळा देण्याचा प्रयत्न केला ते म्हणाले,माझे शिक्षणही अत्यंत प्रतिकूल परिस्थितीमध्ये झाले.जीवनामध्येआईचे काय महत्व असते, आई म्हणजे समर्पण असे का म्हटले जाते हे त्यांनी उपस्थित श्रोत्यांना आपल्या आई च्या त्यागाबद्दल अत्यंत भावनिक होऊन सांगितले.या क्षेत्रामध्ये कार्य करत असताना बाबा आमटे यांच्याकडे जाऊन तेथील कुष्ठरोग्यावर उपचार केले,तसेच गडचिरोली, मेळघाट इथेही सेवा देण्याची संधी मिळाली. मागील जवळपास २६ वर्षात साडेचार लाख मोफत शस्त्रक्रिया केल्या.तसेच पन्नास लाख याचकांना दृष्टी देण्याचं अलौकिक कार्यही केले.सध्याच्या काळात विविध आजारांचा प्रादुर्भाव वाढत आहे,डायबिटीज विषयी सांगताना ते म्हणाले,जिभेवर नियंत्रण ठेवा,हृदयाला जपा व किमान तीन किलोमीटर नियमित चाला.कारण शरीर स्वास्थ्य हे निरोगी ठेवणं काळाची गरज आहे.

अध्यक्षीय समारोपात लहू गळगुंडे म्हणाले की,प्रबोधनासाठी अशी व्याख्याने आयोजित करणे अत्यावश्यक आहे.यातून जीवन जगण्याची योग्य दिशा मिळते.तसेच जीवना तील अनंत अडचणींना सामोरे जाण्याचे बळ ही मिळते.जीवन जगण्या च्या विविध पद्धती असतात,सुरुवातीच्या काळामध्ये शिक्षणा साठी गुरुकुल ही व्यवस्था होती,आता ही संकल्पना कुलगुरू पर्यंत आली.ध्येय म्हणजे जगणं होय.

# केज तालुक्यातील ९० हजार शेतकऱ्यांना मिळणार ४१ कोटी ५९ लाखाचा पीक विमा

केज (प्रतिनिधी)

खरीप हंगाम २०२४ मध्ये सप्टेंबर महिन्यात झालेल्या अतिवृष्टीने सोयाबीन,कापूस या पिकासह इतरही पिकांचे मोठ्या प्रमाणा वर नुकसान झाले होते. त्यानुसार पीक विमा नुकसान भरपाईची रक्कम ४१ कोटी ५९ लाख ६० हजार ६८८ रुपये मंजूर करण्यात आले असून केज तालुक्यातील विमा धारक पात्र शेतकऱ्यांच्या बँक खात्यात दि.१४ एप्रिल पासून विमा रक्कम जमा होण्यास सुरुवात झाली आहे.त्यामुळे गत हंगामात घटलेले उत्पादन,शेतीमालाचे घसरलेले भाव यामुळे आर्थिक संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना थोडाफार आधार मिळाला आहे.

खरीप हंगाम २०२४ मध्ये पंतप्रधान पिक विमा योजने अंतर्गत केज तालुक्यातील २ लाख २२ हजार ६९० शेतकऱ्यांनी पीक विमा अर्ज दाखल करुन १ लाख १० हजार ३६५ हेक्टर जमीनीवरील पिके विमा संरक्षित केले होते.त्यापैकी ९५ टक्के क्षेत्रातील विमा हा सोयाबीन पिकावर उतरण्यात आला होता. गत वर्षी सप्टेंबर महिन्यात झालेल्या अतिवृष्टी व सततच्या पावसामुळे पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते.या नुकसानी संबंधीचे ९० हजार २८ ऑनलाइन तक्रार अर्जविमा कंपनी कडे आले होते ते सर्व मंजूर झाले आहेत.केज तालुक्यातील पीक नुकसान भरपाईस पात्र ठरलेल्या शेतकऱ्यांना ४१ कोटी ५९ लाख ६० हजार ६८८ रुपयांची विमा रक्कम पुढील आठ दिवसात त्यांच्या खात्यात जमा करण्यात येणार असल्याची माहिती तहसीलदार राकेश गिड्डे यांनी प्रतिनिधीशी बोलताना दिली.पीकविम्याची रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा होण्यास सुरुवात झाल्यामुळे लाभधारक शेतकरी समाधान व्यक्त करत आहेत.शेतकऱ्यांचे एकूण विमा अर्ज २ लाख,२२ हजार,६९० एकूण जमीन क्षेत्र १ लाख,१४ हजार,८४६ हेक्टर विमा संरक्षित जमीन क्षेत्र १लाख,१० हजार,३६५ (हेक्टर) एकूण पीक नुकसान तक्रार अर्ज ९० हजार,२८ हेच विमा रक्कमेस पात्र ठरले आहेत. स्थानिक आपत्ती व काढणी पश्चात पीक नुकसान भरपाई विमा रक्कम ४१ कोटी ५९ लाख,६० हजार,६८८ रुपये ६०टक्के शेतकरी विम्या पासून राहणार वंचित?

खरीप हंगाम २०२४ मध्ये शेतकऱ्यांकडून २ लाख,२२ हजार,६९० विमा अर्ज भरण्यात आले.यापैकी पीक नुकसानीची विमा कंपनीकडे तक्रार केलेल्या ९० हजार,२८ शेतकऱ्यांनाच विमा रक्कम मिळणार आहे. कंपनीच्या नियमानुसार नैसर्गिक आपत्तीमुळे पिकांचे नुकसान झाल्यास ७२ तासाच्या आत विमा कंपनीकडे ऑनलाइन तक्रार अर्ज करावा लागतो.त्यामुळे ज्या शेतकऱ्यांनी पीक नुकसानीचे ऑनलाइन तक्रार अर्ज केले नाहीत त्यांना विमा रक्कम मिळणार नाही.पिकांचे नुकसान झाले परंतु विमा कंपनीकडे ऑनलाइन तक्रार केली नाही असे ६० टक्के शेतकरी विम्याच्या लाभांपासून वंचित राहणार आहेत.पीक नुकसानीच्या तक्रारी बाबत शेतकऱ्यांमध्ये अद्याप अज्ञान आहे. बऱ्याच शेतकऱ्यांकडे स्मार्टफोन उपलब्ध नाहीत.माहितगार शेतकऱ्यांनी तक्रार करण्याचा प्रयत्न केला आसता विमा कंपनीचे वेबसाईट व पचालली नसल्यामुळे सर्व शेतकरी ऑनलाईन तक्रार करू शकले नसल्याची माहिती शेकापचे भाई मोहन गुंड यांनी प्रतिनिधीशी बोलताना दिली.

# बोडखेवाडीत आ.सुरेश धस यांच्या हस्ते नवीन वर्गखोलीचे लोकार्पण



पाटोदा (प्रतिनिधी)

तालुक्यातील बोडखेवाडी येथे दि.१९ रोजी आ.सुरेश धस यांनी भेट दिली. व जिल्हा परिषदेच्या शाळेसाठी २५१५ हेड अंतर्गत नवीन वर्गखोलीचे काम पूर्ण झाले आ.सुरेश धस यांच्या हस्ते या नवीन वर्गखोलीचे श्रीफळ फोडून लोकार्पण केले. याबाबत अधिक माहिती अशी की पाटोदा तालुक्यातील बोडखेवाडी गावाला दि.१९ रोजी आ.सुरेश धस यांनी भेट दिली. याठिकाणी जिल्हा परिषदेच्या शाळेसाठी २५१५ हेड अंतर्गत नवीन वर्गखोली बांधण्याचे काम मंजूर केले होते. हे काम आता पूर्ण झाले आहे. यासाठी गावकऱ्यांनी मोठ्या उत्साहाने श्रीफळ आ.सुरेश धस यांच्या हस्ते या नवीन वर्गखोलीचे लोकार्पण केले.

नवीन वर्गखोलीमुळे शाळेतील विद्यार्थ्यांना आता चांगल्या सुविधा मिळतील. यापूर्वी वर्गखोल्या कमी असल्याने मुलांना अडचणी यायच्या. पण आता त्यांना शिकण्यासाठी पुरेशी जागा आणि चांगले वातावरण मिळेल. प्रसंगी गावकरी, पालक आणि शिक्षकांशी बोलताना आ.धस म्हणाले

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर साहित्य अकॅडमीचा राज्यस्तरीय पुरस्कार उपप्राचार्य प्रा.गौतम गायकवाड यांच्या ग्रंथास जाहीर

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

येथील प्रवर्तनवादी चळवळीतील आघाडीचे लेखक उपप्राचार्य प्रा.गौतम गायकवाड यांच्या 'बुध्द प्रबुद्ध विचारांच्या पाऊलखुणा' या ग्रंथास सन-२०२५ साठी दिला जाणारा राज्यस्तरीय 'डॉ.बाबासाहेब आंबेडकर साहित्य अकॅडमी' तृतीय पुरस्कार जाहीर झाला आहे. या बाबतचे पत्र त्यांना नुकतेच प्राप्त झाले आहे. त्यांच्या या उल्लेखनिय यशाबद्दल उपप्राचार्य प्रा.गायकवाड यांचे सर्वस्तरांतून अभिनंदन होत आहे.

यापूर्वी याच संस्थेचा 'व्हि.जे.आरक' या ग्रंथास राज्यस्तरीय तृतीय, 'प्रज्ञासुर्याचे सुर्यपुत्र' या ग्रंथास राज्यस्तरीय प्रथम आणि 'डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि आंबेडकरी साहित्य (आकलन आणि अवलोकन)' या ग्रंथास सन- २०२२ साठी दिला जाणारा राज्यस्तरीय 'डॉ.बाबासाहेब आंबेडकर साहित्य अकॅडमी' द्वितीय पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले आहे. या उपरोक्त संस्थेचा सलग हा चौथा पुरस्कार उपप्राचार्य प्रा.गौतम गायकवाड यांना मिळाला आहे. ही विशेष उल्लेखनीय बाब आहे. उपप्राचार्य प्रा.गायकवाड हे आंबेडकरी चळवळीतील आघाडीचे लेखक, कवी आणि विचारवंत आहेत. त्यांच्या समग्र व उल्लेखनिय कारकिर्दीची दखल घेत डॉ.बाबासाहेब आंबेडकर साहित्य अकॅडमी, लातूर यांच्या वतीने त्यांनी लिहिलेल्या 'बुध्द प्रबुद्ध विचारांच्या पाऊलखुणा' या ग्रंथास सन-२०२५ साठीचा पुरस्कार जाहीर झाला आहे. या बाबत अकॅडमीचे सचिव प्रकाश घादगिने यांनी कळविले आहे. त्यानुसार या पुरस्काराचे वितरण शनिवार, दि. २६ एप्रिल २०२५ रोजी सकाळी १० ते दुपारी ५ या वेळेत डॉ.भालचंद्र ब्लड बँक, बसस्टँड मागे, लातूर येथे आयोजित डॉ.बाबासाहेब आंबेडकर साहित्य अकादमीचे पहिले साहित्य संमेलनात मान्यवरांच्या हस्ते करण्यात येणार आहे. प्रा.गौतम गायकवाड यांना यापुर्वीही डॉ.जगजीवनराम लेखक पुरस्कार (नेपाळ), प्रेरणा समीक्षा पुरस्कार (पुणे), समाजभुषण पुरस्कार (सोलापुर), उत्कृष्ट लेखक पुरस्कार (लातूर) आणि व्ही.जे.आरक या ग्रंथास राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त झाले आहेत. उपप्राचार्य प्रा.गायकवाड यांचे २१ हून अधिक पुस्तके, विविध



वृत्तपत्र, नियतकालिकांतून लेखन, दहा पेक्षा अधिक ग्रंथांचे संपादन, त्यांनी केले आहे. या सोबतच सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक आणि धार्मिक कार्यात त्यांचा सक्रीय सहभाग राहिला आहे. अनेक चर्चासत्रात सहभाग घेत विविध नियतकालिकांतून त्यांचे तिनशेहून अधिक लेख प्रकाशित झाले आहेत. नवोदित साहित्यिक, कवी यांना प्रोत्साहन देण्याचे तसेच त्यांच्या ग्रंथ प्रकाशनासाठी प्रसंगी सर्वोतोपरी भरीव सहकार्य करण्याचे कार्य देखिल प्रा.गायकवाड यांनी वेळोवेळी केले आहे. व्ही.जे.आरक सेवाभावी संस्था आणि परिवर्तन साहित्य मंडळाचे ते अध्यक्ष ही आहेत. तसेच 'परिवर्तन संशोधन' मासिकाचे कार्यकारी संपादक आहेत. परिवर्तन साहित्य संमेलनाच्या आयोजनात त्यांचा पुढाकार आहे. आगामी काळात ११ विविध विषयांशी संबंधीत ग्रंथ, काव्य संग्रह, प्रवर्तनवादी चळवळीला बळ देणाऱ्या ग्रंथाचे लेखक म्हणून ही ते ओळखले जातात. या सर्व विषयांवरील त्यांच्या ग्रंथसंपदा प्रकाशनाच्या वाटेवर आहेत. उपप्राचार्य प्रा.गौतम केरबा गायकवाड हे सध्या अंबाजोगाईतील खोलेश्वर महाविद्यालयाचे उपप्राचार्य आणि मराठी भाषा विभागात प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत. मागील ३३ वर्षांपासून ते अध्यापनाचे कार्य करीत आहेत. त्यांनी नाटक, कथा, कविता, प्रासंगिक, संशोधन, संपादन आदी विपुल ग्रंथ व साहित्य संपदा निर्मिली आहे. त्यांना डॉ.बाबासाहेब आंबेडकर साहित्य अकॅडमी, लातूर यांच्या वतीने त्यांनी लिहिलेल्या 'बुध्द प्रबुद्ध विचारांच्या पाऊलखुणा' या ग्रंथास सन-२०२५ साठीचा पुरस्कार जाहीर झाला आहे. त्याबद्दल उपप्राचार्य प्रा.गौतम गायकवाड यांचे सामाजाच्या सर्वस्तरांतून अभिनंदन होत आहे.

## पान १ वरून...

### पालकमंत्री अजितदादा,...

स्थानकाचे होत असलेले निकृष्ट काम पाहून कंत्राटदाराचे कान टोचणार आहेत का ? अन्यथा बीड बस स्थानकाचे करोडो रुपयाचे काम मातीत गेल्याशिवाय राहणार नाही.

बीड मध्यवर्ती बस स्थानकाच्या अद्यावत उभारणीसाठी माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांच्या पुढाकारातून तसेच लोकप्रतिनिधींच्या पुढाकारातून महाराष्ट्र सरकारने करोडो रुपयांचा निधी दिला. जुने बस स्थानक पाडण्यात आले. आणि नवीन अद्यावत बस स्थानकाच्या उभारणीचे काम सुरू झाले. काम झटपट जलद गतीने होत असतानाच मागील काही दिवसापासून काम बंद झाले आहे. सदरील काम हे निधी नसल्यामुळे बंद असल्याचे समजते.निधी अभावी जर मध्यवर्ती बस स्थानकाचे काम रखडले असेल तर दररोज बीडच्या मध्यवर्ती बस स्थानकात येणाऱ्या हजारो लोकांच्या आरोग्याशी शासन आणि बीड आगार खेळत आहे. बीडच्या आगारांमध्ये बस उभा राहण्यासाठी कुठेही जागा नाही. कोणती बस कुठे उभे राहते आणि ती कधी निघून जाते ? याचा काहीही ताळमेळ राहिलेला नाही. काही बसेस बस स्थानकाच्या पाठीमागे असलेल्या रस्त्यावर येतात. त्या ठिकाणी प्रवासी बसतात.गाडी बस स्थानकाच्या आत न येताच बाहेरूनच निघून जाते. अनेक बसेस प्रवाशांना बीडच्या आगारात न सोडता पाठीमागच्या रस्त्यावर सोडतात. त्यामुळे प्रवाशांची मोठी गैरसोय होत आहे. बस स्थानक पाडण्यात आल्यामुळे शौचालय कुठे आहे हे प्रवाशांच्या लक्षात येत नाही. जुने शौचालय पाडण्यात आलेले नाही मात्र ते पत्र्याचे शेड ठोकल्यामुळे कोणालाही लक्षात येत नाही. त्यामुळे महिला आणि पुरुष दोघेही जिथे कुठे आडोसा दिसेल अथवा उभ्या असलेल्या बसच्या बाजूचा आधार घेत त्या ठिकाणी जाऊन शौचालयाला बसत आहेत. अंधाराचा फायदा घेऊन जर एखाद्या महिलेवर, मुलीवर जर कोणी त्या ठिकाणी अन्याय अत्याचार केला तर प्रशासनाला जाग येणार आहे का ? काही आंबट शौकीन महाभाग तर अशा अडोस्याच्या बाजूला उभे राहून शौचालयाला जाणाऱ्या महिलेला, मुलीला चोरून बघत राहतात. काही तर यापेक्षा पुढे जाऊन आपल्या मोबाईल मध्ये त्यांचे उघडे नागडे व्हिडिओ फोटो घेतात. हे बीड जिल्हा आगार प्रमुख अथवा व्यवस्थापक यांच्या लक्षात येत नाही का ? बीडच्या बस स्थानकामध्ये प्रवाशांसाठी पिण्याच्या पाण्याची कुठेही व्यवस्था करण्यात आलेली नाही. काही सामाजिक संस्थांनी पुढाकार घेऊन काही दिवसापूर्वी या ठिकाणी थंडगार पाण्याचे जार प्रवाशांसाठी सुरू केले आहेत. मात्र ही नैतिक जबाबदारी बीड आगाराची नाही का ? कच्चे रस्ते असल्यामुळे बस आल्यानंतर आणि जाताना मोठ्या प्रमाणात धूळ उडते.कचखडी टाकल्यामुळे खडी टायर खालून सुसाट निसटते आणि जर एखाद्या प्रवाशाला हा खडा लागला तर नको ती बिकट परिस्थिती निर्माण होते. कोणती बस जागा शोधून ड्रायव्हर कधी कुठे वळवेल, कधी पुढे नेईल, कधी मागे घेईल याचा कसलाच अंदाज नसल्याने अनेक प्रवाशांना या ठिकाणी बसचा धक्का बसल्याने टायर खाली आल्याने गंभीर जखमी व्हावे लागले आहे. याला जबाबदार कोण ?

# शिवसंग्रामच्या पुण्यातील बैठकीत राज्यस्तरीय सदस्य नोंदणीची सुरवात
## कर्जमाफीपेक्षा शेतकऱ्यांना अर्थक्षम करण्यावर भर द्यावा

पुणे ।प्रतिनिधी

राज्यातील शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्याविषयी कुणाचे दुमत असण्याचे कारण नाही. मात्र, वारंवार कर्जमाफीवर चर्चा करण्यापेक्षा शेतकऱ्यांना अर्थक्षम करण्यावर अधिक भर देण्याची गरज आहे. त्यांच्या कृषी उत्पादनांना चांगला भाव देण्यासहकृषी उत्पादनावर प्रक्रिया, शेतीक्षेत्रालाबिगरशेती क्षेत्राची जोड, कृषी व सहकार विभागातील समन्वय आणि सहकार व महसूल विभागाच्या समन्वयातून खरीप व रब्बी हंगामात १०० टक्के पीककर्ज उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी शिवसंग्राम पक्षाच्या अध्यक्षा ज्योती विनायक मेटे यांनी केली.

पुण्यातील हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे कलादालनात शिवसंग्राम पक्षाची राज्यस्तरीय बैठक पार पडली. त्यानंतर ज्योती मेटे यांनी आयोजित पत्रकार परिषदेत माध्यमांशी संवाद साधला. प्रसंगी प्रदेश उपाध्यक्ष प्रभाकर कोलंगडे, प्रदेश चिटणीस योगेश विचारे, पुणे शहराध्यक्ष भरत लगड, ज्येष्ठ पदाधिकारी शेखर पवार, वसंत पाटील, पी. के. चव्हाण यांच्यासह सर्व जिल्ह्यांचे अध्यक्ष व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

ज्योती मेटे म्हणाल्या, आजच्या बैठकीत छत्रपती संभाजी महाराजांचे स्मारक व स्मृतीस्थळ, तसेच पानिपत येथील मराठ्यांच्या शौर्य इतिहासाच्या प्रतिक असलेले स्मृतीस्थळ उभारणीसाठी अर्थसंकल्पात तरतूद केल्याबद्दल शासनाचे अभिनंदन करते. अरबी समुद्रातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकाचे जलपूजन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते होऊनही स्मारकाच्या कामास प्रत्यक्ष सुरुवात झालेली नाही. त्यामुळे मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांनी याप्रकरणी तातडीने लक्ष देऊन मुंबई उच्च न्यायालय, तसेच सर्वोच्च न्यायालयात सक्षमपणे बाजू मांडून स्मारकाचे कामकाज त्वरित सुरु करावे. स्वराज्य संकल्पक शहाजी महाराजांचे हौदेगिरी (दावणगिरी) कर्नाटक येथे स्मृतीस्थळ उभारणेबाबत कार्यवाही करावी.

केंद्रीय अर्थसंकल्पात महिलांच्या स्टार्टअपसाठी विशेष तरतूद करण्यात आली आहे. महाराष्ट्रात मोठ्या संख्येने महिलांच्या स्टार्टअपला प्रोत्साहन मिळण्यासाठी जिल्हा स्तरावर इनक्युबेशन सेंटर, जिल्हा उद्योग केंद्रामध्ये विशेष कक्ष निर्माण करावा. महाराष्ट्र शासनातील चतुर्थश्रेणी आणि अखिल भारतीय सेवेतील अधिकारी यांचे सेवानिवृत्तीचे वय सध्या ६० वर्षे आहे, तर केंद्र शासनासह २५ राज्यांत सेवानिवृत्तीचे वय ६० वर्षे आहे. महाराष्ट्रात मात्र सेवानिवृत्तीचे ५८ वर्षे आहे. त्यामुळे ही बाब अत्यंत अव्यवहार्य आहे. शासन धोरणानुसार ५५ वर्षे वयांवरील चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यास पात्रतेनुसार तृतीय श्रेणीत पदोन्नती मिळाली तरी निवृत्ती वय ५८ वर्षे असल्याने त्याचा लाभ होत नाही. त्यामुळे राज्यातील अधिकारी कर्मचाऱ्यांमध्ये सर्वदूर नाराजीची तीव्र भावना होत आहे. त्यामुळे राज्य शासकीय कर्मचाऱ्यांचे सेवानिवृत्तीचे वय ६०वर्षे करावे, सरथीची विभागीय कार्यालय कार्यक्षम करावीत परदेशी शिक्षणाच्या सारथीच्या शिष्यवृत्ती करिता असणारी उत्पन्नाची मर्यादा काढून टाकण्यात यावी असेही मेटे यांनी नमूद केले.



बीडमधील गुन्हेगारीवर बोलताना ज्योती मेटे म्हणाल्या, सरपंच संतोष देशमुख यांची हत्या निंदनीय असून, हत्येप्रकरणातील दोषींवर कठोर कारवाईची मागणी सुरुवातीपासून करत आहे. यातील आरोपींना अटक झाली आहे. पालकमंत्री म्हणून अजित पवार यांनी पदभार स्वीकारल्यानंतर बीडच्या जनतेप्रमाणे आम्हालाही प्रशासन चांगले काम करेल, अशी आशाआहे. अजित पवार यांचा प्रशासनावर वचक असून, अपेक्षेप्रमाणे काम होत असल्याचे दिसून येत आहे. अंबाजोगाईमध्ये वकील महिलेलाझालेली मारहाण चीड आणणारी आहे. अशा घटनांमुळे बीडचीप्रतिमा मलिन होत आहे. त्यामुळे पोलिसांनी गुन्हा करणारा राजकीय पक्षाचा कार्यकर्ता किंवा पदाधिकारी याकडे न पाहता कठोर कारवाई करावी, अशीच आमही मागणी आहे.

आगामी काळात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांत शिवसंग्रामचीभूमिका त्यावेळी जाहीर करू. आता शेतकऱ्यांचे, महिलांचे प्रश्न सोडवण्यालाप्राधान्य देत आहोत. तसेच राज्यभरात शिवसंग्रामचीसदस्य नोंदणी मोहीम सुरु असून, पक्षबांधणीवरभर दिला जात आहे. प्रत्येक जिल्ह्यात अधिकाधिक संख्येने शिवसंग्राम पक्षातलोकांना सामावून घेतले जात असल्याचेही मेटे यांनी सांगितले.

यावेळी भगवान बाजीराव लंबे जिल्हाध्यक्ष बुलढाणा, धनंजय बाजड जिल्हाध्यक्ष रिसोड मालेगाव विधानसभा या नियुक्त्या देण्यात आल्या तर दादासाहेब चंद्रभान वाघ सरपंच नेवासा , रमेश शेठ लूनिया अहिल्या नगर यांना शिवसंग्राम मध्ये अधिकृत प्रवेश देण्यात आला.

# निविदा सुचना

**महाराष्ट्र शासन**
**मृद व जलसंधारण विभाग,**
**आयुक्त, मृद व जलसंधारण, छत्रपती संभाजीनगर**
**प्रादेशिक जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, छत्रपती संभाजीनगर**
**जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, बीड**

**पत्ता - जायकवाडी कॉलनी, नगर रोड, बीड**
ई मेल पत्ता - eemilsdivbeedgmail.com Phone- 02442-22.2.520
ई निविदा सुचना क्र. बी-१ / ०१ सन २०२५-२६ ( फेरनिविदा - द्वितीय वेळ)

जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, बीड हे जिल्हा वार्षिक योजना सन २०२४-२५ अंतर्गत कामांसाठी सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्याकडे उचित वर्गवारीत नोंदणीकृत सुशीक्षीत बेरोजगार अभियंता यांच्याकडुन (केवळ बीड जिल्ह्यातील सुबेअ) खालील कामाकरिता बी-१ नमुन्यातील ई निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाचे संकेतस्थळ http://www.mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावीत. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, बीड यांनी राखुन ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ. क्र. | कामाचे नाव | निविदा किंमत | मुदत महिने | निविदा फीस | कंत्राटदाराचा प्रवर्ग | कार्यालयाचे नाव |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | जोडवाडी सिनाब १ ता.गेवराई जि.बीड | २८.७६ लक्ष | ०३ महिने | रू.२३६०/- | सुबेअसाठी राखीव | जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग,बीड |

ई निविदा उपलब्ध कालावधी :- दिनांक २२.०४.२०२५ ते दिनांक २९.०४.२०२५
ई निविदा उघडणे :- दिनांक ०२.०५.२०२५
खालील ठिकाणी ई निविदाबाबत सर्व माहिती उपलब्ध आहे.
१) संकेतस्थळ http://mahatenders.gov.in
(सदर निविदा सूचनामध्ये काही बदल होत असल्यास वरील संकेतस्थळावर कळविण्यात येईल.)
२) सविस्तर निविदा सूचना जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, बीड यांचे कार्यालयातील सूचना फलकावर उपलब्ध आहे.

दि. १५.०४.२०२४
जिमाका बीड । जाहि। २०२५-२६/०७

**स्वाक्षरित/-**
**जिल्हा संधारण अधिकारी**
**मृद व जलसंधारण विभाग,बीड**

# TENDER NOTICE

**Government of Maharashtra**
**Soil and Water Conservation Department**
**Commissioner, Soil and Water Conservation, Chhatrapati Sambhajinagar**
**Regional Water Conservation Officer, Soil and Water Conservation Department, Chhatrapati Sambhajinagar**
**District Water Conservation Officer, Soil and Water Conservation Department, Beed**

Address -Jaykwady Colony, Nagar Road, Beed
Email Id — eemilsdivbeed@gmail.com Ph.No. 02442-222520
E-Tender Notice No. B-1/01 For Year : 2025-26 (Retender II Call)
District Water Conservation Officer, Soil & Water Conservation Department, Beed is hereby inviting online B-1 Tenders under district annual planning 2024-25 scheme From Unemployed Educated Engineers register with PWD In Beed District only), in appropriate class for the following works.
The blank B-1 tender documents are available on below mentined website.
Main Portl: http//: www.mahatenders.gov.in
The right to reject any or all the tenders without assigning any reason whatsoever is reserved with the Competent Authority. Conditional tenders will not be accepted.

| Sr. No. | Name of Work | Tender Notice | Time period per tender | Tender Fees | Class of Contractor | Name of Office |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Construction of Jodewadi CNB 1 Tq.Georai Dist.Beed | 28.76 Lakh | 03 Month | Rs.2360/- | Reserved for UEE | D.W.C.O. Soiil and Water Conserva-tion Dept.Beed |

Tender Sale Period :- Date 22.04.2025 to Date 30.04.2025
Tender opening Date: Date 02.05.2025
Detail tender notice is available
1) Web site http://mahatenders.gov.in.
(If any change in this Notice will be convey on the same website.)
2) Detailed tender notice is available on the notice board of District Water Conservation Officer, Soil and Water Conservation Department, Beed.
Date: 15.04.2025

**Signature**
**District Water Consrvation Officer,**
**Soil & Water Conservation**
**Department, Beed**


# वडवणी येथे आज होणाऱ्या उत्कर्ष शिंदे यांच्या भीम गीताच्या कार्यक्रमाला लाखोच्या संख्येने उपस्थित रहा

## विश्वरत्न डॉ. आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष राहुल घाडगे यांच्या आव्हान

वडवणी (प्रतिनिधी)

विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त आज वडवणी याठिकाणी सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्या वतीने शिंदेशाही घराण्याचे सुप्रसिद्ध गायक, संगीतकार उत्कर्ष आनंद शिंदे यांचाभीम गीतांचा कार्यक्रम होणार असून या कार्यक्रमाला वडवणी शहरासह पंचक्रोशीतील आणि तमाम जिल्ह्यातील भीमसैनिक, बहुजन विचारसरणीच्या अनुयायांनी लाखोच्या संख्येने उपस्थित रहावे. असे आव्हान जयंती उत्सव समितीच्या समितीचे अध्यक्ष व वडवणी नगरपंचायतीचे कर्तव्यदक्ष नगरसेवक, युवा नेते राहुल घाडगे यांनी केले आहे.



महाराष्ट्रातीलच नव्हे तर भारत देशातील भीम गीताचे बादशहा, रचनाकार, संगीतकार आणि गायक म्हणून शिंदे घराण्याकडे पाहिले जाते. तर नुकतेच 'एक चमत्कार व्हावा, एक जादूच व्हावी, गगनातून यावं एक विमान... त्यातून उतराव... माझ्या भिमान... भिमान हे भीम गीत अवघ्या महाराष्ट्रात सह इतर राज्यातही धुमाकूळ घालत आहे. या गीता सोबत ही इतरही भिमा गीत व मराठी गीत देखील सुप्रसिद्ध आहेत. याच भीम गीताचे गायक तथा शिंदेशाही घराण्याचे चिरंजीव उत्कर्ष आनंद शिंदे व त्यांचा संपूर्ण संचआज सायंकाळी ठीक ७ वा. वडवणी शहरातील विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक याठिकाणी भव्य-दिव्य असा भीम गीताचा कार्यक्रम होणार आहे या माध्यमातून महाप्रबोधन तसेच डॉ . आंबेडकरांची महती व कार्यांचे देखील गायक उत्कर्ष शिंदे यांच्या वाणीतून ते सांगणार आहेत तर या भीम गीतांच्या जलसा कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून माजलगाव विधानसभा मतदारसंघाचे युवा नेते तथा जिल्हा परिषदेचे विद्यमान सभापती जयसिंगभैया सोळंके साहेब हे असणार आहेत. तर उत्कर्ष शिंदे यांच्या भीम गीतांच्या भव्य कार्यक्रमाला वडवणी शहरासह तालुक्यातील व तमाम बीड जिल्ह्यातील आंबेडकरी समाजासह विचारवंत व बहुजन विचारसरणीच्या अनुयायांनी लाखोच्या संख्येने उपस्थित रहावे असे आव्हान जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष व वडवणी नगरपंचायतीचे कर्तव्यदक्ष नगरसेवक युवा नेते राहुल घाडगे यांच्या सह कार्याध्यक्ष-परमेश्वर उजगरे, उपध्यक्ष-बाबासाहेब वाघमारे, प्रशांत (लखन) उजगरे, समाधान उजगरे, दिलीप रोकडे, सचिव-अमोल मुरालीधर उजगरे, कोषाध्यक्ष-शाम सुधाकर उजगरे, संघटक-प्रज्वल उजगरे, अजिंक्य उजगरे, सहसंघटक- अमोल वाघमारे, युवराज उजगरे, सहसचिव-किरण उजगरे (आमदार), राज उजगरे, रामेश्वर पाटोळे यांनी केले आहे.

# निपुण महाराष्ट्र अभियांनातर्गत कृती कार्यक्रम जरेवाडी पटर्न

आष्टी (प्रतिनिधी)

निपुण महाराष्ट्र अभियांनातर्गत कृती कार्यक्रम (जरेवाडी पॅटर्न) सन २०२४ - २५ ची शैक्षणिक कृती कार्यक्रमाची आमदार सुरेश धस यांनी अचानक पडताळणी केली. सोमवार दिनांक २१ एप्रिल २०२५ रोजी सकाळी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा भवरवाडी, तालुका आष्टी, जि. बीड या शाळेला आमदार सुरेश आण्णा धस यांनी अचानक भेट देऊन राज्यात सुरू असलेल्या निपुण महाराष्ट्र अभियांनातर्गत कृती कार्यक्रम अंतर्गत जरेवाडी पॅटर्न कृतीपत्रिका अध्ययन क्षमता दिनांक २१ / ०४ /२०२५ च्या वाचन स्तर, लेखन स्तर, संख्याज्ञान, संख्यावरील क्रिया स्तराची गुणवत्ता पडताळणी केली.

अचानक शाळा भेट दिली असतांनाही जरेवाडी पॅटर्ननुसार प्रा. शा. भवरवाडीच्या प्राथमिक शिक्षकांनी धाराशिव जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था चे प्राचार्य डॉक्टर जाटनुरे सर यांनी केलेल्या



मार्गदर्शनानुसार अध्यापनातील विविध उपक्रमामुळे विद्यार्थ्यांचे भाषा वाचन, लेखन, संख्याज्ञान, संख्या वरील क्रिया या क्षमतांचा अपेक्षित विकास झाल्याचे पाहून आमदार सुरेश अण्णा धस यांनी तोंड भरून कौतुक केले.

विद्यार्थ्यांशी खेळीमेळी च्या वातावरणात संवाद साधून विद्यार्थ्यांकडून चावडीवाचनही करून घेतले. लेखन कौशल्य विकासा अंतर्गत राबवण्यात येत असलेला सुंदर हस्ताक्षर या उपक्रमाची पाहणी करताना शाळेतील सर्वच १००% विद्यार्थ्यांचे अतिशय सुंदर हस्ताक्षर पाहून आदरणीय आमदार महोदय यांनी सुंदर हस्ताक्षराचे मार्गदर्शक शिक्षक अनिल बेदरे सर यांचे कौतुक केले. याप्रसंगी शाळेला नवी प्रशस्त इमारत आणि कमी असलेल्या सर्व भौतिक सुविधांची येत्या शैक्षणिक वर्षात सुविधा करून देण्यात येईल अशी आमदार सुरेश आण्णा धस यांनी घोषित केले. याप्रसंगी सरपंच भरत भवर, संजय भवर, किसन भवर, दादासाहेब भवर, नवनाथ भवर, तुकाराम भवर, प्रविण भवर, हनुमंत मोरे, दत्ता भवर, सागर भवर, विक्रम भवर, संतोष मोरे, संतोष भवर, शरद बागल, गोवर्धन वाहटुळे, अशोक भवर, राम भवर, बंडू भवर, कल्याण भवर, भास्कर भवर, परसराम भवर, शेषेराव भवर, लखन भवर, छगन इंगवले, मुख्याध्यापक सुनिल काकडे सर व सहशिक्षक अनिल बेदरे सर हे उपस्थित होते

# कड्यात मध्यरात्री व्यापा-याचे घर फोडले, पोलिसांचा लाल दिवा पाहताच, चोरट्यांची भागंमभाग

आष्टी (प्रतिनिधी)

कडा येथील आडत दुकानदार दिलीप बलदोटा यांच्या घरातील दोन महिला व पुरुषांना शस्त्राचा धाक दाखवून अज्ञात चोरट्यांनी सोने, चांदीसह रोख रक्कम मिळून असा २ लाख ३२ हजार रुपयांचा ऐवज लांबविला. सदर घटना रविवारी मध्यरात्री तीन वाजेच्या सुमारास कड्यातील धामणगाव रस्त्यालगत कन्या शाळेसमोर असलेल्या बलदोटा यांच्या घरी घडली. याबाबत पोलिस सुत्रांकडून मिळालेली अधिक माहिती अशी की, धामणगाव रस्त्यालगत असलेल्या भगिनी निवेदिता कन्या शाळेसमोर दिलीप बलदोटा व त्यांचे बंधू कुटुंबासह राहायला आहेत.



रविवारी पहाटे तीनच्या सुमारास अज्ञात चोरट्यांनी बंगल्याचा दरवाजा कटावणीने तोडून घरात प्रवेश केला, मात्र तत्पूर्वी चोरट्यांनी सीसीटीव्ही कॅमेरे सुरुवातीलाच तोडून काढले व घरातील वेगवेगळ्या रूम मधील कपाटे उचकून त्यातील रोख रक्कम एक लाख रुपये आणि एक लाख तीस हजाराचे सोन्याचे दागिने असा एकूण दोन लाख ३२ हजारांचा ऐवज अज्ञात चोरट्यांनी लांबविला. यावेळी घरात असलेले दिलीप बलदोटा व त्यांच्या पत्नी यांना जाग आली असता चोरट्यांनी शस्त्राचा धाक दाखवून घरात दहशत निर्माण केली. यावेळी बलदोटा यांच्या बंगल्याजवळील एका घराच्या छतावर काहीजण मजूर झोपले होते. त्यांना अचानक जाग आल्याने चोरीचा संशय आला, म्हणून शेजा-यांनी पोलिसांना फोन केला व काही क्षणातच विभागीय रात्रगस्तीवर असलेले सपोनि विजय नरवाडे, पोशि सचिन गायकवाड, चालक प्रताप घोडके, पोकॉ सय्यद मजहर, दीपक भोजे या कर्मचा-यांनी घटनास्थळी धाव घेताच, पोलिसांना पाहताच त्या चोरट्यांनी पोलिसांवर दगडफेक करीत अंधाराचा फायदा घेत पळ काढला. त्यामुळे संभाव्य अनर्थ टळला असल्याचे बोलले जात आहे. याप्रकरणी पोलिसांनी तपासाला गती देत तात्काळ श्वान पथकासह अंगुली मुद्रापथकाला पाचारण करुन घटनास्थळाची पाहणी केली. सदरचा पुढील तपास सपोनि नरवाडे करीत आहेत. या चोरीच्या घटनेमुळे ग्रामस्थ भयभीत झाले असून, कड्यातील पोलिसांनी हातात काठी व शिट्टी घेऊन गस्त करण्याऐवजी शस्त्र घेऊन रात्रीची गस्त वाढवावी अशी मागणी होत आहे.



# पद्मिनबाई धोंडीराम जोगदंड यांचे निधन

अंबाजोगाई(प्रतिनिधी )

येथील पत्रकार मारुती धोंडीराम जोगदंड यांच्या मातोश्री पद्मिनबाई धोंडीराम जोगदंड यांचे अल्पशा आजाराने निधन झाले आहे.

त्यांच्या पार्थिवावर शनिवारी सकाळी भिम नगर परळी वेस येथे अंत्य संस्कार करण्यात आले यावेळी विविध क्षेत्रातील व्यक्तींची उपस्थिती होती

त्यांच्या पश्चात दोन मुले,दोन मुली,नातवंडे असा परिवार आहे

# डीजेच्या कर्कश आवाजाचा समाजातील महिला,मुले व वृध्दांना त्रास -मिलिंद घाडगे

परळी /प्रतिनिधी

महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त काढण्यात येणाऱ्या मिरवणुकीत जे मोठ मोठे डीजे लावले जात आहेत.या डीजेच्या कर्णकर्कश आवाजाचा महिला, लहान मुले वयोवृद्धांना त्रास होत असल्याचे दिसत आहे त्यामुळे इतर वाद्यांचा जयंती मंडळांनी अवलंब करावा असे आवाहन वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा महासचिव यांनी केले ते मौजे नाथरा येथे विश्वरत्न, बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलत होते.

सकाळी १० वाजता पंचशील ध्वजाचे ध्वजारोहण होऊन प्रबोधनाचा कार्यक्रम उत्साहामध्ये घेण्यात आला. पंचशील ध्वजाचे ध्वजारोहण गावचे उपसरपंच श्रीकांत मुंडे यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा महासचिव मिलिंद घाडगे हे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून भारतीय बौद्ध महासभेचे तालुकाध्यक्ष हनुमंत वाघमारे सर, भारतीय बौद्ध महासभेच्या शहराध्यक्ष प्रजावतीताई कांबळे, समता सैनिक दलाचे डॉ. स्वप्नील



महाळंगीकर, समता सैनिक दलाचे यशपाल बचाटे, समता सैनिक दलाचे जयपाल पांचांगे, सुभाष मुंडे हे होते.

अध्यक्षीय समारोपात मिलिंद घाडगे यांनी सांगितले की डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी प्रत्येक क्षेत्रामध्ये समाजाला पुढे नेण्याचे काम केले आहे. बाबासाहेब आंबेडकरांच्या अथक परिश्रमामुळेच आज समाज वैभवाचे जीवन जगत आहे. ज्या काळामध्ये खायला भाकर नव्हती त्या काळात प्रचंड उत्साहामध्ये बाबासाहेब आंबेडकरांची जयंती निघायची. आणि त्या जयंतीच्या मिरवणुकीमध्ये बाबासाहेबांचा जयजयकार करणाऱ्या प्रचंड घोषणा परिसर दणाणून टाकायच्या बाबासाहेबांचे अनुयायी वेगवेगळ्या कलाकुसर दाखवायचे लेझीम पथक असायचे हलक्या, ढोल, बँजो अशा प्रकारचे कानाला चांगले वाटावे असे सुमधुर वाद्य मिरवणुकीमध्ये वाजवल्या जायचे. परंतु आजची मिरवणूक वेगळ्या पद्धतीने भरकटत जाते की काय अशी भीती वाटू लागलेली आहे.

डीजेच्या कर्कश आवाजापुढे आजचा तरुण बाबासाहेबांच्या जयघोष करणाऱ्या घोषणा विसरून गेला आहे. हे घातक असून बाबासाहेबांच्या जयंतीचा उद्देशच नाहीसा होत आहे. यावर चिंतन मनन होणं अत्यंत गरजेचे आहे मिरवणुकीचा बिभत्सपणा जाऊन मिरवणुकीमध्ये सुमधुर वाद्य यायला हवे असे मत मिलिंद घाडगे यांनी व्यक्त केले.

याप्रसंगी हनुमंत वाघमारे, प्रजावतीताई कांबळे,डॉक्टर स्वप्नील महाळंगीकर, यशपाल बचाटे यांनीही आपले विचार व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भिम शाहीर प्रबोधनकार राहुल सूर्यवंशी सर यांनी तर आभार गौतम आदमाने यांनी मांडले. कार्यक्रम करण्यासाठी संजीवन पैठणी, भगवान बनसोडे, आकाश तूप समुद्रे, दयानंद बनसोडे, सुयोग किरवले, विद्याकर हरभडे, सुनील किरवले, पंढरीनाथ आरबडे, अशोक वावळे, विमलताई शिंदे, कविताताई पैठणे, संगीताताई सूर्यवंशी, रेखाताई वाघमारे, इंदुताई हरबडे, पंकजाताई किरवले इत्यादींनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाला महिला, पुरुष, बालक बालिका मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बागवान कब्रस्ताना रस्त्यावर घाणीचे साम्राज्य



शहागड ।प्रतिनिधी

अंबड तालुक्यातील शहागड येथील बागवान कब्रस्तान राष्ट्रीय महामार्ग ५२ लगत असून या ठिकाणी मटन व चिकनची घाण आणून टाकली जाते. यामुळे या भागात दुर्गंधी पसरली आहे. या संबंधीची माहिती कब्रस्तान कमिटीचे अध्यक्ष मोबीन करीम वागवान यांनी ग्रामपंचायत प्रशासनाला दिली आहे.

ग्रामपंचायत प्रशासनाकडून दुर्लक्ष केले जात आहे. ग्रामपंचायत प्रशासनाने या संबंधी संबंधित व्यावसायिक यांना कचरा न टाकण्याच्या सूचना देऊन दुर्लक्ष केले जात आहे. व्यवसाय करणाऱ्यांनी तात्काळ घाण टाकायाचे थांबवावे. नसता कारवाई करण्यात येईल. असे ग्रामपंचायत अधिकारी व्हि. एम. राठोड, सरपंच सौ जोगदंड यांनी कळविले आहे.

# अंत्योदय म्हणजे शासनाच्या अनेक हितकारी योजना समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहविणार – आ.सुरेश धस

## कुसळंब येथे माऊली जरांगे यांच्या प्रयत्नाने आयोजित बांधकाम कामगारांना साहित्य वाटप

आष्टी (प्रतिनिधी)

बांधकाम कामगारांना सामाजिक सुरक्षा प्रदान करणे, कामगारांच्या कुटुंबियांना आर्थिक सहाय्य उपलब्ध करून देणे. कामगारांच्या मुलांना शिक्षणासाठी मदत करणे हे यासह अन्य फायदा मिळवून देणं हे या योजनेच मूळ वैशिष्ट असून त्यासाठी ही योजना आहे याचा फायदा सर्वांनी घ्यावा असे आवाहन परंतु यामध्ये वंचित असलेला मजूर कामगार याला या योजनेचा प्राधान्याने फायदा झाला पाहिजे. शेवटी अंत्योदय म्हणजे समाजातील शेवटच्या घटका पर्यंत शासनाच्या योजनेचा फायदा हा सर्वसामान्यांना झाला पाहिजे. त्यासाठी असे कार्यक्रम वेळोवेळी घेण्याचे काम माऊली जरांगे करतात ही चांगली बाब असल्याचे प्रतिपादन आ. सुरेश धस यांनी केले.

पाटोदा तालुक्यातील कुसळंब येथे आयोजक अंमळनेर जिल्हा परिषद गटाचे सदस्य माऊली जरांगे यांच्या प्रयत्नातून आयोजित बांधकाम मजुरांना महाराष्ट्र इमारत व बांधकाम कामगार मंडळाच्या वतीने बांधकाम कामगारास घरगुती भांडी व बांधकाम साहित्य वाटप कार्यक्रमाप्रसंगी ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर बांधकाम कामगार व्यवस्थापक विक्रांत वीर साहेब, आयोजक जि. प. सदस्य माऊली जरांगे, सभापती किरण शिंदे पाटील, दिलीप भराटे, गोविंद गाडे, महेश खेगरे, शाहुराव टेकाळे, श्रीहरी गिते, रामेश्वर गोरे, दादासाहेब पवार, भारत मानमोडे, गोवर्धन सुळे उपस्थित होते.

यावेळी पुढे बोलताना आ. धस म्हणाले की, शासनाच्या अनेक हितकारी योजना असून २००२ साली मी गाळ उपसा



योजनेला आष्टी मध्ये सुरुवात केली त्यानंतर ही योजना शासन स्तरावर अंमलात आणण्यात आली. शेतकऱ्यांच्या शेतीला उन्नत करण्यासाठी शेत शिवार पोषिक करण्यासाठी तलावातील गाळ जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी या योजनेचा लाभ घ्यावा, शिवाय यामुळे गाळ उपसा झाल्याने या तलावातील पाणी पातळी वाढण्यास मोठी मदत होणार असल्याचे ही आ. सुरेश धस म्हणाले.

यावेळी माऊली जरांगे बोलताना म्हणाले, आ. सुरेश धस यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक योजना शेतकरी असो की, सर्वसामान्य नागरिक प्रत्येक घटकापर्यंत पोहचविण्यासाठी काम आम्ही कार्यकर्ते करत असतो. यामध्ये कधीच राजकारण करत नाही. प्रत्येक योजना प्रत्येक घटकापर्यंत पोहचवीत आहोत. सामान्य माणूस आहे आणि ही योजना त्यांच्या पर्यत आ. धस यांच्या आदेशाने ती पोहच करणार असल्याचे शेवटी त्यांनी सांगितले. यावेळी अंमळनेर जिल्हा परिषद गटातील नागरिक व लाभार्थी तसेच कुसंळब ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# लग्नानंतर महिलांनी माहेरी जास्त दिवस का थांबू नये ?

कारण समजल्यावर वाटेल आश्चर्य!

चाणक्य नीती जीवनाच्या विविध पैलूंवर आधारित सखोल आणि व्यावहारिक ज्ञान देते. यामध्ये कुटुंब, नातेसंबंध, समाज आणि वैयक्तिक जीवनाशी संबंधित महत्त्वाच्या शिकवणींचा समावेश असतो. चाणक्यच्या मते, विवाहानंतर महिलांनी दीर्घकाळ माहेरी राहणे कुटुंब आणि समाजासाठी अनुकूल मानले जात नसे. यामागे अनेक सांस्कृतिक, सामाजिक आणि मानसिक कारणे दिली गेली आहेत.चाणक्य नीतीच्या या तत्त्वाचे महत्त्व आणि त्यामागील तर्क जाणून घेऊया.

चाणक्य यांनी आपल्या ग्रंथात कुटुंब हा समाजाचा पाया आहे असे वर्णन केले आहे. लग्नानंतर स्त्रीचे नवीन घर हे तिचे प्राथमिक निवासस्थान असते. कुटुंब एकत्र आणण्यात आणि नवीन घरात समृद्धी आणण्यात ती महत्त्वाची भूमिका बजावते. पालकांच्या घरी जास्त वेळ घालवल्याने नवीन कुटुंबात समन्वय साधण्यात अडथळे निर्माण होऊ शकतात.चाणक्य नीतीनुसार, लग्नानंतर स्त्रीने आपल्या नवीन घरातील परंपरा, प्रथा आणि जबाबदाऱ्या स्वीकारल्या पाहिजेत. दीर्घकाळ माहेरी राहिल्याने यामध्ये व्यत्यय येऊ शकतो. ज्यामुळे नवीन नातेसंबंधांतील संतुलन राखण्यात अडचण येऊ शकते.जुन्या काळात स्त्रिया आपल्या पालकांच्या घरी जास्त वेळ घालवत असतील तर तो समाजात चर्चेचा विषय होऊ शकतो. याचा परिणाम केवळ स्त्रीवरच नाही तर तिच्या कुटुंबाच्या प्रतिष्ठेवरही होऊ शकतो. महिलांनी अशा परिस्थिती टाळल्या पाहिजेत असे चाणक्य मानत होते.आजच्या काळात जिथे महिलांना वैयक्तिक स्वातंत्र्य आणि करिअरला प्राधान्य दिले जाते, तिथे हे धोरण काळानुरूप



बदलण्याची गरज आहे. चाणाक्य नितीचा मुख्य संदेश आजही प्रासंगिक आहे. ज्यानुसार नातेसंबंध मजबूत करण्यासाठी नवीन घराला प्राधान्य दिले पाहिजे.चाणक्य नीतीची ही कल्पना कुटुंब आणि समाजात संतुलन राखण्यावर आधारित आहे. मात्र, आजच्या बदलत्या विचारसरणी आणि सामाजिक परिस्थितीत लवचिकता अंगीकारली पाहिजे. लग्नानंतर स्त्री तिच्या माहेरी किती दिवस राहते हे तिच्या वैयक्तिक परिस्थिती आणि आवडीनिवडींवर अवलंबून असते.असे असले तरी नातेसंबंध मजबूत करणे आणि नवीन जबाबदाऱ्यांचे पालन करणे हा प्रत्येकाच्या जीवनाचा एक महत्त्वाचा भाग असावा, हा चाणक्यांच्या या उपदेशाचा सार आहे.

# पत.-मल्टीस्टेच्या अडचणी सोडवण्याकरिता मंत्र्यांना निवेदन संचालक ड. रविंद्र कानडे यांनी मांडल्या संस्थांच्या व्यथा

सहकार मंत्र्यांनी घेतली तात्काळ दखल ; तातडीने बोलावली बैठक

माजलगाव : प्रतिनिधी

येथील लोकनेते सुंदरराव सोळंके नागरी सहकारी पतसंस्थेच्या तेलगाव शाखेच्या च्या नवीन वास्तू उद्घाटन प्रसंगी उद्धाटक म्हणून महाराष्ट्र राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील हे दिनांक २१ एप्रिल रोजी आले असता पतसंस्था व मल्टीस्टेच्या अडचणी सोडवण्याकरिता सहकार मंत्र्यांना महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन चे संचालक ऍड. रविंद्र कानडे यांनी सविस्तर निवेदन दिले यावर विचार नक्कीच करू असे आश्वासन सहकार मंत्र्यांनी दिले आहे.

महाराष्ट्र राज्यातील पतसंस्था व फेडरेशन यांच्या कायद्यामध्ये आवश्यक तो बदल व्हावा वसुली कायदे यामध्ये देखील सुधारणा व्हावी कलम १०१,१५६, व विक्री अधिकारी यांच्या कायद्यामध्ये सुधारणा होऊन भक्कमपणे संस्थांना काम करता यावे तसेच संस्थेच्या गुंतवणुकी बाबत सुरक्षितता तसेच सभासदांच्या ठेवीना विमा संरक्षण मिळावे त्याचबरोबर योग्य कर्जदार सभासद निवडता यावा करिता सिबिल सारख्या कंपन्या संस्थांना जोडता याव्यात व सहकार समृद्ध होण्यासाठी आवश्यक त्या सर्व इतर बाबींच्या सुधारणा करण्यासंदर्भातले सखोल मागण्यांचा उल्लेख या निवेदनात करण्यात आला असुन प्रसंगी राज्याचे सहकार मंत्री यांनी देखील सहकारात्मक भूमिका घेऊन सर्व प्रश्न सोडवण्यासाठी सरकार निश्चितच काम करेल असे



आश्वासन दिले यावेळी आ. प्रकाशदादा सोळंके , जिल्हाधिकारी अविनाश पाठक , उपजिल्हा निबंधक समृद्ध जाधव यांच्या समवेत निवेदन सादर करण्यात आले.

सहकार मंत्र्यांनी घेतली तात्काळ दखल

तातडीने बोलावली बैठक

निवेदनाची तात्काळ दखल घेऊन मंत्री बाबासाहेब पाटील यांनी तात्काळ फेडरेशनचे पदाधिकारी आणि मंत्रालयीन अधिकारी यांची दि. २३ रोजी बैठक बोलावली असल्याची माहिती फेडरेशनचे अध्यक्ष काकासाहेब कोयटे यांनी दिली.




हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग ॲण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बँक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

# बीड जिल्ह्याच्या सामाजिक सलोख्यासाठी बाळा बांगरच पहिलं पाऊल!

## स्व.देशमुख कुटुंबीयांची भेट घेऊन शाळेला नाव देण्याचा घेतला निर्णय! युवकांची टीम तयार करून सामाजिक सलोख्यासाठी काम करणार : बाळा बांगर

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोद्यातील बांगर कुटुंबीय म्हणजे सामाजिक सलोख्याचे केंद्रबिंदू म्हणून ओळखले जाते. संघर्षातून उदयाला आलेले बांगर कुटुंबीय सहकार क्षेत्रात आपली वेगळी ओळख निर्माण करणारे बांगर साहेब त्यांच्याच पावलावर पाऊल टाकत विजयसिंह बाळा बांगर यांनी सुरू केलेली सामाजिक सलोख्याची चळवळ खऱ्या अर्थानं यशस्वी ठरताना दिसत आहे. स्वर्गीय संतोष देशमुख यांच्या कुटुंबीयांची भेट घेऊन संतोष देशमुख यांचं एका शाळेला नाव देण्याचा निर्णय घेऊन सामाजिक सुलोख्याचा संदेश दिला आहे.

गेल्या अनेक महिन्यापासून बांगर कुटुंबीयांवर अनेक संकट आली आणि ती बांगर कुटुंबीयांनी खंबीरपणे पेलवली पण समाजामध्ये सुरू असलेला सामाजिक तेड कमी करण्यासाठी बांगर कुटुंबीय नेहमीच अग्रेसिव राहिले आहे, त्याचाच एक भाग म्हणून आज स्वर्गीय संतोष देशमुख यांच्या कुटुंबीयांची भेट घेऊन स्व.संतोष देशमुख यांचं शाळेला नाव देण्याचा निर्णय घेऊन सामाजिक सलोखा जपण्याचं महत्त्वाचं आणि पहिलं पाऊल उचल आहे. अनेक वर्षापासून बीड जिल्ह्यामध्ये सामाजिक सलोख्याचं केंद्रबिंदू म्हणून बांगर कुटुंबीयांकडे पाहिलं जातं तीच परंपरा आज विजयसिंह बाळा बांगर यांनी कायम ठेवत स्वर्गीय संतोष अण्णा देशमुख यांचे नाव शाळेला देण्याचं निर्णय घेऊन सामाजिक सलोख्याचा संदेश दिला आहे. मस्सजोग येथे जाऊन देशमुख कुटुंबियांची भेट घेऊन हा निर्णय जाहीर केला यावेळी विजयसिंह बाळा बांगर यांच्या समवेत सेवा सोसायटीचे संचालक- सय्यद सज्जाद, सचिन पवार यांच्यासह मस्साजोग गावातील




ज्येष्ठ व तरुण वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता..

रामकृष्ण बांगर साहेबांचे नाव घेताच मसाजोगचे ग्रामस्थ झाले भावुक!

सहकार क्षेत्रात काम करत असताना सहकार महर्षी रामकृष्ण बांगर यांनी बीड जिल्ह्यातील प्रत्येक गावामध्ये काम केले आहे, त्यामुळे प्रत्येक गावात बांगर साहेबांना आदराने ओळखल जाते, आज बाळा बांगर यांनी मस्साजोग येथे देशमुख कुटुंबीयांची भेट घेतली यावेळी ग्रामस्थांनी रामकृष्ण बांगर साहेबांचं नाव घेऊन जुन्या आठवणींना उजाळा देत भावुक झालेले पाहायला मिळाले..

# सौ. सरिता गोंडे यांची महसूल सहाय्यक सिंधुदुर्ग येथे निवड झाल्याबद्दल सत्कार संपन्न



बीड ।प्रतिनिधी

बीड तालुक्यातील जुईस गव्हाण या ग्रामीण खेड्यातील सर्वसामान्य कुटुंबातील सरिता गोंडे यांची राज्य सेवा महसूल सहाय्यकपदी जिल्हा सिंधुदुर्ग येथे निवड झाली आहे. यसुयशाबद्दल तिचा सत्कार करतांना पत्रकार संघाचे प्रदेश संपर्कप्रमुख वैभव स्वामी,महिला जिल्हाध्यक्ष शेख आयेशा आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या अनिता वाघमारे मॅडम. घरची परिस्थिती हलकीची असल्याने कोणतेही क्लासेस, ट्युशन, स्टडी क्लासेस न करता सौ सरिता गोंडे गोताळ यांनी घरी बसून प्रामाणिकपणे अभ्यास केला.संसार आणि अभ्यास अशी दुहेरी भूमिका त्यांनी प्रतिकूल परिस्थितीत सुद्धा यशस्वीपणे हाताळली.नुकत्याच झालेल्या राज्यसेवा महसूल सहाय्यक पदाची परीक्षा त्यांनी एमपीएससी ग्रुप सी अंतर्गत दिली.एन टी बी स्पोर्ट रँक महाराष्ट्र एक अंतर्गत त्यांची महसूल सहाय्यक जिल्हाधिकारी कार्यालय सिंधुदुर्ग येथे निवड झाली आहे. प्रतिकूल परिस्थितीवर मात करत मिळवलेल्या या सुयशाबद्दल तिचे महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई आणि दैनिक समर्थ राजयोग परिवाराच्या वतीने पुष्पगुच्छ देऊन पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देताना प्रदेश संपर्कप्रमुख वैभव स्वामी तसेच पत्रकार संघाच्या महिला जिल्हाध्यक्ष शेख आयेशा आणि शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या अनिता वाघमारे यांनी त्यांचा त्यांच्या निवासस्थानी जाऊन शाल, पुष्पगुच्छ, श्रीफळ देऊन आणि पेढा भरवून पुढील वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या.

# कृष्णा - भिमा स्थिरीकरण योजना प्रत्यक्षात उतरणार का दिव्य स्वप्नच ठरणार - नितीन पाटील

संभाजीनगर प्रतिनिधी

पावसाळ्यात कृष्णा नदीतून वाहून जाणारे अतिरिक्त पाणी अडवून ते भीमा खोऱ्यात आणणारी आणि पश्चिम महाराष्ट्रातील दुष्काळी भागासह शेजारच्या मराठवाड्यासाठी संजीवनी देणारी कृष्णा- भिमा स्थिरीकरण योजना सुरू करण्याचा निर्णय राज्य सरकारने १५ वर्षांपूर्वी घेतला होता पण राजकारणापायी व राजकीय इच्छाशक्ती अभावी हा प्रकल्प बासनात गुंडाळून ठेवण्यात आला आहे. कृष्णा आणि वारणा नदीला आलेल्या महापुरामुळे कोल्हापूर व सांगली जिल्ह्यांवर ओढवलेले महासंकट संपूर्ण देशाने पाहिले आहे. या महापुरामुळे मोठ्या प्रमाणात जीवित व मालमत्तेची वित्तहानी झाली आहे. तर शेकडो टीएमसी पाणी कर्नाटक वाहून गेले आहे. दक्षिण महाराष्ट्रावरील महापुराचे संकट हळूहळू दूर होऊन तेथील परिस्थिती पूर्वपदावर येत असली तरीही काही भागात पुराचा धोका अद्यापही कायम आहे. कोल्हापूर व सांगली भागाला महापुराचे संकट नवीन नाही तर तेथे अधून मधून अशी परिस्थिती उद्भवतेच २०१९ साली त्यावेळी महापुराने कहरच केला असल्याच्या पार्श्वभूमीवर आता महापुराचे असे अधून मधून उद्भवणारे संकट दूर होण्यासाठी नदी पूर रेषेची मर्यादा ओलांडून नदीपात्रापर्यंत अतिक्रमणे करून होणारी बांधकामे आणि शेतीवर चर्चा होईल.

शासनाकडूनही या संदर्भात कठोर पावले उचलण्याची ग्वाही दिली जाईल आणि पुन्हा सारे काही सुरळीत झाल्यानंतर ही चर्चाही थांबेल या भागाच्या दृष्टिकोनातून महत्वाची कृष्णा- भीमा स्थिरीकरण योजना ही महत्त्वाची योजना मानली जाते तत्कालीन एप्रिलमध्ये झालेल्या लोकसभा निवडणुकीत तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हा प्रकल्प राबविण्याची ग्वाही अकलूज येथे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या जाहीर सभेत दिली होती. त्यामुळे दुष्काळग्रस्त भागातील शेतकऱ्यांच्या आशा पल्लवीत झाल्या होत्या परंतु तत्कालीन जून मध्ये राज्य विधिमंडळ अधिवेशनात कृष्णा - भिमा स्थिरीकरण योजना प्रकल्पाचे काम करता येणार नाही. असे स्पष्टीकरण तत्कालीन जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांना द्यावे लागले. एका खोऱ्यातून दुसऱ्या खोऱ्यात किंवा एका उपखोऱ्यातून दुसऱ्या उपखोऱ्यात पाणी वाहून नेण्यावर पाणी तंटा लवाद आयोगाने बंदी घातली आहे. त्यामुळे हा प्रकल्प कितीही महत्त्वाचा असला तरीही त्याचे काम करता येणार नाही. त्यावेळी सभागृहात असा निर्वाळा गिरीश महाजन यांनी दिल्यामुळे त्याचा प्रतिकूल परिणाम पुणे व सोलापूर सह सांगली सातारा तसेच शेजारच्या मराठवाड्यातील उस्मनाबाद व बीड अशा सहा जिल्ह्यातील ३१ तालुक्यांना पिण्याच्या पाण्यासह सिंचन व उद्योगासाठी मिळणारे पाणी कायदेशीर अडचणीमुळे उपलब्ध होणार नाही. प्राप्त परिस्थितीत एकीकडे कोल्हापुरातील व सांगलीतील महापुराचे महासंकट आणि दुसरीकडे सोलापूर व माणपट्ट्यासह मराठवाड्यातील उस्मनाबाद बीड आदी भागात दुष्काळाचे कायम असलेले सावट असे विसंगत चित्र दिसत असताना या भागासाठी कृष्णा-भिमा स्थिरीकरण प्रकल्पाची गरज किती महत्त्वाची आहे. हे आज पुन्हा अधोरेखित होऊ लागले आहे. तत्कालीन लोकसभेच्या निवडणुकीत अकलूजच्या प्रचार सभेत बोलताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी कृष्णा- भीमा स्थिरीकरण प्रकल्पाचा थेट नामोल्लेख न करताही दुष्काळी भागात पिण्यासाठी सिंचनासाठी आणि उद्योगासाठी पाणी आणण्याची योजना सुरू करण्याचा शब्द दिला होता. त्याच सभेत यांच्या साक्षीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कृष्णा-भिमा स्थिरीकरण प्रकल्पाचा थेट नामोल्लेख करून हा प्रकल्प राबविण्याची ग्वाही दिली होती आता मात्र शासन कायद्याची अडचण सांगत आहे. ही कायदेशीर अडचण कृष्णेच्या महापुरामुळे ओढवलेल्या महा संकटाचा विचार करता सोडवावी लागणार आहे दरवर्षी पावसाळ्यात कृष्णेतील अतिरिक्त ११५ टीएमसी पाणी कर्नाटकात वाहून जाते हे पाणी अडवून भीमा खोऱ्यात वळविल्यास दुष्काळी भागाला मोठा



दिलासा मिळणार होता. (तत्कालीन महापुरात कृष्णेतील सुमारे ७०० टीएमसी पाणी कर्नाटकात वाहून गेले) २००४ साली तत्कालीन उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील यांनी पुढाकार घेऊन हा प्रकल्प शासनाकडून मंजूर करून घेतला होता. त्यावेळी या प्रकल्पाची मूळ प्रशासकीय मान्यता म्हणजेच किंमत सुमारे पाच हजार कोटींची होती. त्याच दरम्यान पुढे मराठवाड्याचे भूमिपुत्र विलासराव देशमुख हे मुख्यमंत्री झाल्यानंतर कृष्णा-भिमा स्थिरीकरण प्रकल्प उभारला जाणार आणि कृष्णेतील पाणी भीमे वाटे उजनी धरणात येणार हे गृहीत धरून 'कृष्णा -मराठवाडा' या नावाचा प्रकल्प झटपट हाती घेतला होता त्यानुसार उजनी धरणातून उस्मनाबाद व बीड साठी तसेच लातूर शहराच्या पाणीपुरवठ्यासाठी दरवर्षी २१ टीएमसी पाणी द्यायचे आहे असा निर्णय झाला होता परंतु उजनी धरणात पाणी असेल तरच हे शक्य होणार होते असे त्यावेळी सरकारचे मत होते उजनी धरणातील एकूण ११७ टीएमसी पाण्यापैकी ९० टीएमसी पाण्याची वाटप झाले आहे त्यामुळे धरण पावसाळ्यात भरलेच नाही तर मोठीच अडचण निर्माण होते हा कटू अनुभव बऱ्याच वेळा आला आहे.मुळातच उजनी धरणातील पाणी नियोजन पूर्णतः कोलमडलेली आहे म्हणून पर्याय म्हणून कृष्णा-भिमा स्थिरीकरण योजना सुरू व्हायला हवी अशी मागणी तत्कालीन सोलापूर व सांगली तसेच मराठवाड्याच्या दुष्काळी पट्ट्यातून वारंवार होत आहे राज्यातील एकूण ९४ अवर्षणप्रवण तालुक्यांपैकी ५६ तालुके कृष्णा खोऱ्यात येतात तर १२ अवर्षणप्रवण तालुके मराठवाड्यातील आहेत त्यामुळे एकीकडे कोल्हापूर व सांगली भागातील महापुराच्या पार्श्वभूमीवर कृष्णा खोऱ्यातील पाण्याचे महत्व अधिक प्रकर्षाने जाणवते कृष्णा-भिमा स्थिरीकरण प्रकल्पासाठी तत्कालीन दरसूचीनुसार सुमारे १५ हजार करोडच्या घरात जात होता परंतु त्यावेळी कोल्हापूर व सांगली भागातील महापुरामुळे झालेल्या नुकसानीचे चित्र पहिले तर नुकसानीचा आकडा त्यावेळी सुमारे १० हजार कोटी पर्यंत निश्चित केला गेल्याचे समजते त्यासाठी राज्य शासनाने केंद्र सरकारकडे ६ हजार ८०० कोटीची मदत मागितली होती अशा नुकसानीसाठी होणाऱ्या खर्चा एवढ्या पैशातून कृष्णा-भिमा स्थिरीकरण योजना उभारणे शक्य आहे असे त्यावेळी जाणकारांचे मत होते त्यामुळे दुष्काळी ३१ तालुक्यातील १२ लाख एकर क्षेत्र सिंचनाखाली येऊ शकेल आणि पर्यायाने त्या भागात सुबत्ता येणार आहे आणि स्थलांतराचे प्रमाण आपोआप कमी होऊन शेती व्यवसायाला चालना मिळणार आहे त्यासाठी प्रबळ इच्छाशक्तीची गरज असल्याचे मग त्या भागातील जल अभ्यासक व जाणकारांनी व्यक्त केले होते तसेच माझ्या मराठवाड्यातील राज्य सरकारच्या दृष्टीने महत्त्वकांक्षी असलेला 'कृष्णा-मराठवाडा' सिंचन योजना व कृष्णा-भिमा स्थिरीकरण योजना या दोन्ही प्रकल्पांना केंद्रीय जल आयोगाची मान्यता नाही तसेच कृष्णा पाणी तंटा निवाड्याच्या लवादाची देखील मान्यता नाही तरीही या योजनाच्या नावाखाली कंत्राटदारासोबत अर्थपुर्ण हितसंबंध जोपासण्यासाठी राजकीय हेतुने प्रेरित होऊन पुढाऱ्यांना पोसण्यासाठी या दोन्ही योजनेचा घाट घातला जात आहे या दोन्ही योजना अव्यवहार्य असुन देखील ही आजमितीला कोट्यावधी रुपये खर्च केले आहेत सिंचनाचे उद्दिष्ट मात्र साध्य झालेले नाही याला सर्वस्वी गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ कार्यालयाचे संबंधित मुख्य अभियंता व संबंधित अधिक्षक अभियंता व क्षेत्रीय कार्यकारी अभियंता उपविभागीय अभियंता व शाखा अभियंता हे जबाबदार आहेत आजपर्यंत या दोन्ही योजनांसाठी संबंधित अधिकाऱ्यांनी कंत्राटदारासोबत अर्थपूर्ण हितसंबंध जोपासण्यासाठी दोन्ही योजना अव्यवहार्य असताना देखील कोट्यावधी रुपयाच्या निविदा स्वहितासाठी मंजूर केल्याचे समजते आहे असे माझ्यासह मराठवाड्यातील शेतकरी जाणकार जलतज्ञ जल अभ्यासक सिंचन अभ्यासक यांचे तांत्रिक विश्लेषणात्मक मत आहे.

# बीडचे वकिल चंदनशीव विरुद्ध औरंगाबाद उच्च न्यायालयाच्या बार कौन्सिल अध्यक्षांकडे तक्रार

## एक प्रकरण प्रलंबित असताना त्या संबंधित दुसरे प्रकरण केले दाखल

बीड ।प्रतिनिधी

शेत जमिनीचा दावा प्रलंबित असताना दुसरा दावा दाखल करुन लोक न्यायालयामध्ये तडजोड करण्यात आले. सदरील दोन्ही प्रकरणातील दाव्यामध्ये एकच वकील आहे. त्यामुळे संबंधित वकील ए.एम. चंदनशीव यांच्या विरुद्ध औरंगाबाद उच्च न्यायालयातील बार कौन्सिल अध्यक्षांकडे तक्रार दाखल करण्यात आली आहे. ॲड. चंदनशीव यांना वकील व्यवसाय करता येऊ नये असा आदेश द्यावा असे तक्रारीत म्हटले आहे. जयदीप सवाई यांनी बार कौन्सिल अध्यक्षांकडे केलेल्या तक्रारीनुसार, नाजुकाबाई धोंडीराम सवाई व सागरबाई साहेबराव डोळस या दोन बहिणींनी बीड जिल्हा न्यायालयात ८ डिसेंबर २०१५ रोजी जमीन मिळकत दिवाणी दावा दाखल केला होता. वाटणी व मालकी हक्क जाहीर करणे व ताब्यास मनाई करु नये, वडिलोपार्जित जमीनीतून हक्क मिळावा यासाठी हा दावा दाखल केला होता. प्रतिवादीकडून म्हणजेच धर्मा जोगदंड यांच्यावतीने ॲड. ए.एम. चंदनशीव यांनी २४ जानेवारी २०१६ रोजी वकील पत्र दाखल केले होते. त्यानंतर याच प्रकरणामध्ये धर्मा जोगदंड याची मुलगी लक्ष्मी किसान वाघमारे यांनी मुख्त्यारपत्रा आधारे प्रतिवादीच्या बाजुने त्यांचे वकील पत्र २३ सप्टेंबर २०२१ रोजी बीड न्यायालयात दाखल झाले. सदरील प्रकरण बीड न्यायालयात प्रलंबित आहे. दरम्यान, धर्मा जोगदंड यांची मुलगी मंगल सुंदर कोकाटे यांनी आपल्या वडिलांविरुद्ध म्हणजेच धर्मा जोगदंड यांच्या विरुद्ध ॲड. ए.एम. चंदनशीव यांनी नव्याने दावा दाखल केला. त्याचा दावा क्रमांक १२९/२०२४ आहे. वादग्रस्त शेत जमिनीचा दिवाणी दावा क्रमांक ६२३/२०१५ सुरु असताना शेत जमिनीचा दुसरा दावा करुन तक्रारदार सवाई यांना न्यायापासून वंचित ठेवण्याचे काम ड. चंदनशीव यांनी केले. त्यानंतर १५ फेब्रुवारी २०२४ रोजी दावा दाखल करुन लगेच ३ मार्च २०२४ रोजी लोकन्यायालयात तडजोड करुन घेतले. विशेष म्हणजे दोन्ही बाजुचे वकील हे ॲड. ए.एम.चंदनशीव हेच आहेत. त्यामुळे नाजुकाबाई सवाई व सागरबाई डोळस यांना नैसर्गिक न्यायापासून वंचित ठेवण्याचे काम केले आहे.

दावा दाखल करता येत नाही..

मिळकतीवर न्यायालयामध्ये दावा सुरु असेल तर त्याच वादग्रस्त मिळकतीबाबत दावा करता येत नाही. अस असताना सुद्धा ॲड. ए.एम. चंदनशीव यांनी दोन्ही बाजुचे वकीलपत्र स्वत:कडे घेऊन चुकीच्या पद्धतीने आर्थिक फायद्यासाठी वकील व्यवसाय करती आहेत. यामुळे मला व माझ्या कुटूंबियांना मानसिक, आर्थिक छळ केला जात आहे. त्यामुळे ॲड. ए.एम. चंदनशीव हे वकील व्यवसाय करण्यासाठी नैतिकदृष्ट्या लायक नाहीत. त्यामुळे ॲड. चंदनशीव यांना वकिली व्यवसाय करता येऊ नये असा आदेश द्यावा अशी मागणी जयदीप सवाई यांनी औरंगाबाद उच्च न्यायालयातील बार कौन्सिल अध्यक्षांकडे केली आहे.

# डॉ. शिवलिंग शिवाचार्य महाराज यांच्या स्मरणार्थ अँड. मनोज संकाये यांच्या हस्ते पाणपोईचे उद्घाटन संपन्न

परळी ।प्रतिनिधी

शिवभक्त डॉ. शिवलिंग शिवाचार्य महाराज अहमदपूरकर यांच्या स्मरणार्थ परळी येथील आयडीबीआय बँकेच्या समोर सामान्य नागरिकांची तहान भागवण्यासाठी पाणपोईचे उद्घाटन सामाजिक कार्यकर्ते अँड. मनोज संकाये यांच्या शुभहस्ते संपन्न यावेळी सारड गावचे माजी सरपंच आघाव साहेब यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रत्येक सामान्य नागरिकांनी पाण्याचा काटकसरीने वापर करण्याची नितांत आवश्यकता असल्याचे प्रतिपादन यावेळी त्यांनी केले.

दरवर्षीप्रमाणे याही वर्षी कडक उन्हाळ्यामध्ये परळीत येणाऱ्या लोकांसाठी पिण्याच्या पाण्याची उत्तम आणि थंडगार सोय व्हावी म्हणून हा उपक्रम ते दरवर्षी राबवतात. पाणी हे जीवन आहे. पाण्यासाठी लोकांची




भटकंती सध्या सुरू आहे परंतु शहरात येणाऱ्या ग्रामीण भागातील तसेच शहरातील नागरिकांची तहान भागवी हा स्वच्छ उद्देश डोळ्यासमोर ठेवून पानपोईची संकल्पना अँड.मनोज संकाये मित्र मंडळ राबवत आहे. यांच्या या उपक्रमाबाबत सर्वत्र समाधान आणि कौतुक होत आहे.

यावेळी मंगलवार मल्टीस्टेट बँकेचे शाखा अधिकारी गजानन हलगे, अनिल चौधरी, काशिनाथ सरवदे संदीप चौधरी , शिवा बडे, बालासाहेब चाटे,प्रवीण रोडे, संतोष कांबळे, बाबुराव ठोके, विशाल नरवणे, देविदास मुंडे आदीसह मित्र मंडळाचे पदाधिकारी उपस्थित होते.




# पहिले आझाद हिंद चषक एम के क्रिकेट संघ बीड जिंकले दुसरे बक्षीस कामखेडा तर तिसरे जरुडने पटकावले

बीड ।प्रतिनिधी

आझाद हिंद सेवाभावी संस्था कामखेडा ता. बीडच्या वतीने आझाद हिंद क्रिकेट चषक कामखेडा २०२५ वर्ष पहिले सय्यद बादशहा उर्स व डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त स्पर्धेचे आयोजिन करण्यात आले होते.फायनल मॅचची टॉस शेख तय्यब संचालक मौलाना आझाद आर्थिक विकास मंडळ मुंबई, मा. अमेर सलीम सेक्रेटरी बीड जिल्हा क्रिकेट असोसिएशन, उपाध्यक्ष इरफान कुरेशी, सदस्य प्रा. जावेद पाशा, मा. जे डी शहा, अडो योगेश टेकाडे अध्येक्ष वकील संघ , उपसरपंच शेख शफिक, राजु पटेल तंटामुक्ती, यूवा नेते शेख कदीर उस्ताद यांच्या हस्ते करण्यात आले.. प्रथम आझाद हिंद कामखेडा संघाने ८ ओहर खेळून ॻ क्रिकेट बीड संघास ६४ धावाचे लक्ष दिले.ॻ संघाने ७ ओहर मध्ये टार्गेट पूर्ण करत ८ विकेटणे सामना जिकूंन प्रथम आझाद हिंद क्रिकेट चषक २०२५ चे प्रथम पारितोषिक पटकवले. तर कामखेडा संघाने दुसरे व जरुड संघाने तिसरे पारितोषिक पटकवले.

स्पर्धेचे मेनऑफ द शिरीज मुस्ताक पटेल, मेनऑफ द मॅच व बेस्ट बॉलर शेख अली सर,बेस्ट कॅच पठाण यासिन व शेख शाहेद काबा यांनी वयक्तिक बक्षीस मिळवली. सर्धेत १६ संघाने सहभाग घेऊन तीन फिफ्टी व एक विकेट हेटट्रिक ची नोंद झाली.सर्धेचे बक्षीस वितरण मा. सलीम जहांगीर प्रदेश उपाध्यक्ष भाजपा , शेख शोएब जिल्हा वक्फ ऑफिसर औरंगाबाद, मा. शेख अमीन ीिळ, सय्यद मुखतार वू ीिळ, मो इसहाक, काजीं मुशहेंद,यांच्या हस्ते करण्यात आले.सदरील सामना ूीीिलश वर दाखवण्यात आला. स्पर्धेचे नियोजन मुसा सर, क्व् रशीद सर,ताहेर काबा,हाजी मतीन,समीर शेख,महेश शिंदे सर, राजेश मस्के,ताहेर ड्राइवर, अनिस बेग,भरत शिंदे,पांडुरंग वाघमारे, राजु अकबर, जीवन पवार, कलीम शेख, शेख साबेर, अरुण पवार,मुन्ना फाटे,शेरू पटेल, आदिल पाठन, सबील शेख, तल्हा पटेल यांनी केले. सर्धा दरवर्षी घेण्याचा संस्थेने ठरवले आहे.

दैनिक समर्थ राजयोग
राजमान्य-राजशक्ती
SAMARTH RAJYOG



# मंथन स्पर्धा परीक्षेमध्ये कै. दत्ताजी भाले प्राथमिक विद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा

अंबड ।प्रतिनिधी

शैक्षणिक वर्ष २०२४ – २५ मध्ये मंथन या स्पर्धा परीक्षेमध्ये इयत्ता पहिली ते सातवी चे एकूण ३७ विद्यार्थी बसले होते. त्यातील सर्व विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.यामध्ये चि. विक्रांत शरद माळोदे – इयत्ता दुसरी – राज्यातून १७ वा व जिल्ह्यातून १२ वा क्रमांक मिळवला आहे,तसेच चि. अर्पित दत्तात्रय गव्हाणे इयत्ता दुसरी – राज्यातून २१ वा व जिल्ह्यातून १६ वा,चि.अन्वय शिवशंकर शेरकर इयत्ता तिसरी – राज्यातून ३२ वा व जिल्ह्यातून २६ वा तसेच चि.नीरज नितीन गायकवाड इयत्ता – चौथी– राज्यातून ३० वा व जिल्ह्यातून २४ वा क्रमांक मिळवून मंथन स्पर्धा परीक्षेमध्ये मेरिट लिस्टमध्ये येण्याचा मान यांनी मिळवला आहे.चौघांचेही संस्थेचे अध्यक्ष सुरेंद्रजी आलूरकर, संस्थेच्या उपाध्यक्षा सौ.ज्योती भाभी ठाकूर,संस्थेचे कार्यवाह डॉ.श्री. हेमंतजी वैद्य, स्थानिक व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष व्यंकटेशजी गोसावी, कार्यवाह,केदारजी मंत्री, शालेय समितीचे अध्यक्ष श्रीपादजी जपे, मुख्याध्यापिका सौ.सुषमाताई मोरगावकर, मूल्यमापन व स्पर्धा परीक्षा विभाग प्रमुख श्रीम.सुवर्णलता खानापूरकर तसेच सर्व शिक्षक वृंद सर्वांनी या विद्यार्थ्यांचे अभिनंदन व कौतुक केले तसेच पुढील वाटचालीस खूप खूप शुभेच्छा दिल्या.









छ. संभाजीनगर – येथे चार संस्थांच्या प्रतिनिधीना लज्जा गौरी सिजर नियंत्रण मोहिम समजावून देण्यासाठी डॉ अशोक काळे, पुणे यांनी अनमोल मार्गदर्शन केले.



डोईफोडवाडी – येथे रंगला वडजाई देवीचा पालखी सोहळा. उत्साही वातावरणात यात्रेस प्रारंभ. हजारो भाविकांनी घेतला पालखी सोहळ्याचा आनंद. (छाया तात्यासाहेब डोईफोडे)

# कोयता, रॉडने प्राणघातक हल्ला

## ५ जण गंभीर जखमी तरीही पोलिसांकडून गुन्हा नोंदवायला टाळाटाळ नातेवाईकांचा संताप,पाच दिवस झाले तरी पोलीस आले नाही !

गेवराई ।प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील आहेर वायगाव येथे दि.१६ एप्रिल रोजी रात्री साडेदहाच्या सुमारास दोन गटांमध्ये भीषण हाणामारी झाली. या प्राणघातक हल्ल्यात कोयता, लोखंडी रॉड, सब्बल आणि धारदार शस्त्रांचा वापर करून थेट जीवघेणा हल्ला करण्यात आला. पाच जण गंभीर जखमी असून, सध्या त्यांच्यावर जिल्हा रुग्णालयात बीड येथे उपचार सुरू आहेत.




जखमींची नावे पुढीलप्रमाणे चांद इस्माईल पठाण (२५), इस्माईल मोहम्मद खान पठाण (६०),फारूक मुसा पठाण (३०),मुसा खान पठाण (६०),मन्नाबी सिद्धी पठाण (सर्व रा. आहेर वायगाव) जखमींवर तातडीने उपचार सुरू करण्यात आले. मात्र या घटनेला चार दिवस उलटूनही गेवराई पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झालेला नाही. पोलिसांकडून चाललेली ही दुर्लक्ष वृत्ती आणि टाळाटाळ नागरिकांच्या जीवाशी खेळणारी ठरत आहे.नातेवाईकांनी संतप्त प्रतिक्रिया देत, पोलिस प्रशासनावर थेट दुर्लक्षाचा आरोप केला आहे.

# रायमोहा येथे पंचशील महिला मंडळाच्या वतीने पाच दिवसीय भिम जयंती महोत्सव साजरा – पल्लवी सुतार

बीड ।प्रतिनिधी

डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती संपूर्ण देशात मोठ्या उत्साहात आणि सार्वजनिक स्वरुपात साजरी केली जाते. त्याच अनुषंगाने रायमोहा ता.शिरुर (का) येथे पंचशील महिला मंडळाच्या वतीने पाच दिवशीय जयंती सोहळा विविध कार्यक्रमांचे आयोजन करुन आनंदाने साजरा करण्यात आला.

यामध्ये पहिल्या दिवशी दि. १३ एप्रिल रोजी धम्म ज्ञान स्पर्धा परीक्षा आयोजित करण्यात आली होती. दुसऱ्या दिवशी दि. १४ एप्रिल रोजी सकाळी पंचशील ध्वजारोहण करण्यात आले.तर दुपारच्या सत्रात महिलांच्या विविध स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. तिसऱ्या दिवशी म्हणजे दि. १५ एप्रिल रोजी सायंकाळी ७:०० वा सामाजिक कार्यकर्ते मनिषा ताई तोकले तसेच प्रा. अशोक मुंडे यांचे व्याख्यान बाजार तळ रायमोहा येथे संपन्न झाले.



चौथ्या दि. १६ एप्रिल रोजी सायंकाळी ७:०० वा. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेची भव्य मिरवणुक काढण्यात आली आणि पाचव्या दिवशी दि.१७ एप्रिल रोजी सकाळी १०. वा महिलांसाठी आरोग्य शिबिर आयोजित करण्यात आले होते.

अशा प्रकारे प्रथमच रायमोहा येथे पाच दिवशीय जयंती सोहळा पल्लवी सुनील सुतार यांच्या संकल्पनेतून पंचशील महिला मंडळ अध्यक्ष – पुष्पा सुतार , उपाध्यक्ष – सुरेखा सुतार , सचिव – आशा सोनवणे , आणि सर्व पदाधिकारी सदस्या , भिम कन्या ग्रुप आणि भीमरत्न ग्रुप व सर्व गावकरी मंडळींच्या वतीने साजरा करण्यात आला.

# छत्रपती शिवाजी महाराज पुतळा ते नगरनाका रस्त्याच्या दरम्यान यु टर्नच नाही

## न्यायालय, मुख्य प्रशासकीय कार्यालय असुन किलोमीटरचा वळसा कश्यासाठी ?

बीड ।प्रतिनिधी

बीड शहरातील बीड ते अहिल्यानगर राष्ट्रीय महामार्गावरील २ किलोमीटरचे काम अंतिम टप्प्यात असुन सध्या दुभाजक उभारणीचे काम सुरू आहे. या रस्त्यावर एक किलोमीटर अंतराच्या पल्ल्यात दोन्ही बाजूंनी जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा व सत्र न्यायालय, सामाजिक न्याय भवन, तहसील, जेल असे २५ हुन अधिक शासकीय कार्यालये आहेत.सदरील मार्ग वर्दळीचा असल्याने ठिकठिकाणी वाहनांना वळण घेण्यासाठी यु टर्न आवश्यक आहे.मात्र छत्रपती शिवाजी महाराज पुतळा ते नगरनाका दरम्यान कार्यकारी अभियंता राष्ट्रीय महामार्ग राजेंद्र भोपळे यांनी तांत्रिक नियमांकडे बोट दाखवून मनमानी कारभार करत शासकीय कार्यालयात येणाऱ्यांना वेठीस धरण्याचा प्रकार केला आहे. यु टर्न नसल्याने नागरीकांना समोर कार्यालय असुनही नाहक दररोज एक किलोमीटरचा वळसा मारावा लागणार आहे.स्वत:चे दुचाकी किंवा चारचाकी वाहन असणाऱ्यांना हा फेरा असला तरी सामान्य नागरिकांना रिक्षातुन आर्थिक भुर्दंड सहन करावा लागणार आहे. त्यामुळे जिल्हाधिकारी, तहसील, जिल्हा सत्र न्यायालय याठिकाणी पुर्वीप्रमाणेच दुभाजकांमध्ये यु टर्न ठेवावेत या प्रमुख मागणीसाठी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली दि.२१ सोमवार रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर दुभाजक ओलांडण्याची शर्यत लक्ष्यवेधी आंदोलन करण्यात आले. निवासी उपजिल्हाधिकारी बीड शिवकुमार स्वामी यांना निवेदन देण्यात आले.यावेळी आंदोलनात शेख युनुस, सुदाम




तांदळे, मुबीन शेख, सुदाम तांदळे,मुस्ताक शेख, बाजीराव ढाकणे , बीड जिल्हाध्यक्ष इंटक रामधन जमाले, बीड जिल्हाध्यक्ष आप अशोक येडे, बीड शहराध्यक्ष आप सादिक इनामदार,आदींनी सहभाग घेतला.

नगर रोडवरील कार्यालये

दक्षिण बाजू : जिल्हा आरोग्य परीक्षण केंद्र ,शासकीय विश्रामगृह, पंचायत समिती, महिला आर्थिक विकास महामंडळ ,बाल संरक्षण अधिकारी कार्यालय, चंपावती क्रीडा मंडळ उत्तर बाजु :– जिल्हा क्षयरोग कार्यालय, जिल्हा परिषद कन्या शाळा,माध्यमिक शिक्षणाधिकारी कार्यालय ,जिल्हा व सत्र न्यायालय, तालुका न्यायालय, कौटुंबिक न्यायालय, जिल्हा जात पडताळणी कार्यालय, अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ ,संत रोहिदास चर्मकार महामंडळ, महात्मा फुले विकास महामंडळ, दिव्यांग कल्याण कार्यालय, जिल्हा परिषद समाज कल्याण कार्यालय, सहाय्यक आयुक्त सामाजिक न्याय विभाग, अण्णाभाऊ साठे आर्थिक विकास महामंडळ ,सार्वजनिक बांधकाम कार्यालय, तहसील कार्यालय, उपविभागीय अधिकारी कार्यालय ,जिल्हा पुरवठा विभाग ,जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा मुद्रांक अधिकारी कार्यालय ,नोंदणी निबंध कार्यालय ,जिल्हा परिषद पदाधिकाऱ्यांची निवासस्थाने या ठिकाणी जाण्यासाठी दररोज शेकडो लोक असतात या सर्वांना दररोज एक किलोमीटरचा वळसा नाहक मारावा लागणार आहे तो कशासाठी ?

२ वर्षांपासून काम रखडलेले, कंत्राटदारास १ कोटीचा दंड परंतु सुधारणा नाहीच – डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर

बीड ते अहिल्या नगर राष्ट्रीय महामार्गावरील बीड शहरातील २ किलोमीटरचे काम २ वर्षांपासून रखडलेल्या अवस्थेत आहे.मार्गावरील खडी,धुरळा उडुन वाहनचालकांना त्रास होत आहे.कंत्राटदाराच्या हलगर्जीपणामुळे नागरीकांना प्रचंड अडचणींचा सामना करावा लागत आहे. अपघाताला निमंत्रण मिळत आहे. सामाजिक संघटना, नागरीकांच्या तक्रारी नंतर जिल्हाधिकाऱ्यांनी या संदर्भाने कठोर भूमिका घेऊन या कामाची पाहणी करून महामार्ग प्राधिकरण आधिका– यांना पत्र देऊन संबंधित कंत्राटदारास १ कोटीचा दंड ठोठावला आहे. सद्यस्थितीत छत्रपती शिवाजी महाराज पुतळा, नगरनाका,बालेपीर याठिकाणी खड्डे खोदून ठेवलेले असुन काम आजही अपुर्ण असुन संथगतीने काम सुरू असुन कंत्राटदाराच्या कामात कोणतीही सुधारणा झालेली नाही.

# सरपंच ॲड. गणेश मोरे यांना युवा महाराष्ट्र फाउंडेशनचा महाराष्ट्र भूषण सन्मान पुरस्कार जाहीर

बीड ।प्रतिनिधी

बीड तालुक्यातील वडगाव कळसंबर येथील सरपंच मा. ड. गणेश आसाराम मोरे यांनी गावातील विविध विकास कामे केले आहेत. आदर्श सरपंच म्हणून त्यांची परिसरात ओळख निर्माण झाली आहे. गोरगरिबांच्या मदतीला धावून जाणारा हा गणेश सतत लोकांच्या सेवेत असतो.

ड . गणेश मोरे यांना महाविद्यालयीन जीवनापासून सामाजिक कार्य करण्याची आवड असून ते नेहमीच समाजकार्यासाठी अग्रस्थानी असतात. गावचे प्रथम नागरिक म्हणून ते उत्तमपणे आपले कार्य करत असल्याने ग्रामस्थ त्यांच्या कार्यपद्धतीवर समाधानी आहेत. ते करत असलेल्या कामाची दखल घेत युवा महाराष्ट्र फाउंडेशन यांनी महाराष्ट्र भूषण सन्मान पुरस्कारसाठी निवड केली आहे. त्यांच्या कार्याची दखल घेत त्यांना युवा महाराष्ट्र फाउंडेशन यांनी महाराष्ट्र भूषण २०२५ चा सन्मान पुरस्कार जाहीर केलेला आहे. यामध्ये अनेक दिगजांचा सन्मान सोहळा पार पडणार आहे. पुरस्कार वितरण २३ एप्रिल २०२५ रोजी दुपारी बारा वाजता पार पडणार आहे. पुरस्कार वितरणासाठी पूजा राठोड अभिनेत्री, इलक्षी गुप्ता अभिनेत्री तानाजी चित्रपट, हसीनी सुधीर अभिनेत्री साउथ चित्रपट, रुचिरा जाधव अभिनेत्री लागीर प्रेमाचं, या पुरस्कार सोहळ्यासाठी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहे. ड . गणेश मोरे यांची सरपंच पदाची दुसरी टर्म असून जनतेतील सरपंच पदाच्या पहिल्या निवडणुकीमध्ये गणेश मोरे बीड जिल्ह्यातील कमी वयात पहिल्या वेळेस जनतेतून सरपंच झालेला मुलगा म्हणून ओळख निर्माण झालेली आहे. आता सध्या त्यांच्या मातोश्री सुशाला आसाराम मोरे या सरपंच आहेत. गणेश मोरे यांची ओळख मेटे साहेबांचा कार्यकर्ता म्हणून निर्माण झालेली आहे. पुरस्कार जाहीर झाल्यामुळे गणेश मोरे यांचे अभिनंदन आणि कौतुक परिसरातून नव्हे तर बीड जिल्ह्यामधून होत आहे, त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होताना पाहायला मिळत आहे. स्वच्छतेच्या उद्देशाने नाली बांधकाम, गटारी योजना, प्रवाहाप्रमाणे नळ पाणीपुरवठा योजना राबवली, गावच्या



स्वच्छतेच्या अनुषंगाने गावातील प्रत्येक घरासमोर शोषखड्डे नियोजन करण्यात आले आहे. गावामधील पाणी असेल ते त्याच ठिकाणी मुरून पाणी पातळी वाढण्यासाठी मदत होते यासाठी त्यांनी अनेक विविध विकास कामे तसेच योजना सुद्धा राबवल्या आहेत. आदर्श ग्रामपंचायत त्यांनी निर्माण केलेली आहे. हा गौरव बीड जिल्ह्यासाठी अत्यंत अभिमानास्पद असून, इतर अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी, सरपंचासाठी प्रेरणादायी ठरणारा आहे.

# छेडछाडीची साक्षी कांबळे ठरली बळी !

## पीडित आईचे एकनाथ शिंदेंना पत्र–साहेब तुमच्या लाडक्या बहिणीच्या मुलीने गळफास घेत जीवन संपवले

बीड / प्रतिनिधी

बीड येथील साक्षी विटेकर या तरुणीने छेडछाड आणि ब्लॅकमेलिंगला कंटाळून आत्महत्या केल्याची घटना घडली आहे. साक्षी कांबळे असे आत्महत्या केलेल्या तरुणीचे नाव आहे. १४ मार्च रोजी तिने धाराशिव जिल्ह्यातील मामाच्या घरात गळफास घेत आत्महत्या केली. एक महिना उलटून गेला असून कुटुंब अद्यापही न्यायाच्या प्रतीक्षेत आहेत. त्यात आता साक्षीच्या आईने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना एक पत्र लिहिले आहे.

एकनाथ शिंदे यांना पाठवलेल्या पत्रात साक्षी कांबळे यांच्या आई म्हणतात, साहेब, मी तुमची लाडकी बहीण. तुम्ही मुख्यमंत्री झाला आणि राज्यातील अस्वस्थ झालेल्या बहिणींना आधार मिळाला. आपण मुख्यमंत्री असताना आपल्या म्हणजेच आम्हासारख्या अगणित बहिणींना भावाचा बंध मिळाला. पण मी नाराज



आहे. आज आपण उपमुख्यमंत्री आहात. मात्र माझ्यासाठी तुम्हीच लाडक्या बहिणीचे मुख्यमंत्री आहात. आज आम्हाला तुमची कमतरता भासते, असे त्यांनी सुरुवातीला म्हटले आहे. पुढे त्या म्हणतात, माझी मुलगी साक्षी हिला हवाई सुंदरी व्हायचे होते. मात्र एका क्षणात ती नाहीशी झाली. काही मुलांनी तिची छेड काढली आणि साहेब तुमच्या लाडक्या बहिणीच्या मुलीने गळफास घेऊन जीवन संपवले. साहेब आम्ही आस धरुन आहोत. तुमची भाची साक्षी या जगात परत येणार नाही, हे आम्हाला देखील माहिती आहे. मात्र त्या क्रूर नराधमांना देखील तेवढी शिक्षा होणे अपेक्षित आहे. एक महिना झाला मात्र पिढीत कुटुंबीयांना अजूनही न्याय मिळाला नाही.आरोपी उघड माथ्याने बीडमध्ये फिरत आहेत. पोलीस प्रशासन नेमकं काय करत आहे ? असा प्रश्न या निमित्ताने पुन्हा एकदा उपस्थित झाला आहे.

# जनसुरक्षा कायद्या विरुद्ध रस्त्यावर उतरणार – नितीन जायभाये



बीड ।प्रतिनिधी

दि.२२ एप्रिल रोजी डाव्या विचारसरणीचे सर्व पक्ष व सामाजिक संघटना एकत्र येऊन जण सुरक्षा कायद्याच्या विरोधात राज्यव्यापी आंदोलन करणार आहेत. अशा सर्व समविचारी राजकीय पक्ष व सामाजिक संघटनांसोबत 'बीड शहर बचाव मंच' या आंदोलनामध्ये सहभागी आहे. 'खुर्ची रक्षा' कायद्याच्या व मनोविकृत षंढ सरकारच्या विरोधात करण्यात येणाऱ्या या आंदोलनामध्ये बीड जिल्ह्यातील जनतेने लाखोंच्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन बीड शहर बचाव मंच च्या वतीने नितीन जायभाय यांनी केले आहे.